
रविवार, १० जुलै २०२२
◆ वर्ष १४ ◆ अंक ३५३
www.ramprahar.com
# राम प्रहर
◆ पाने ८ ◆ किंमत ₹२ ◆ रायगड

## ‘महागाईतून सर्वसामान्यांना लवकरच मिळणार दिलासा’



**नवी दिल्ली** : चालू आर्थिक वर्षाच्या दुसऱ्या सहामाईत महागाई हळूहळू कमी होईल, असा विश्वास भारतीय रिझर्व बँकेचे गव्हर्नर शक्तिकांत दास यांनी व्यक्त केला आहे, तसेच महागाई नियंत्रणात आणण्यासाठी रिझर्व बँकेतर्फे आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत असल्याचेही ते म्हणाले. कौटिल्य आर्थिक परिषदेच्या कार्यक्रमात ते बोलत होते. सद्य स्थितीत देशात पुरवठा योग्य पद्धतीने सुरू आहे. त्यामुळे चालू आर्थिक वर्ष २०२२-२३च्या शेवटच्या सहा महिन्यात महागाई नियंत्रणात येण्याची शक्यता आहे. देशात आर्थिक स्थैर्य राहण्यासाठी किमती नियंत्रणात असणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी रिझर्व बँकेतर्फे आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहेत, असेही शक्तिकांत दास म्हणाले.

### अंतरंग
गव्हाण विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी/३
महाड परिसरात २६ ठिकाणी स्वयंचलित पर्जन्यमापक/७
टीम इंडियाच्या झिम्बाब्वे दौऱ्याचे शेड्युल जाहीर/८

# आषाढीनंतर होणार मंत्रिमंडळ विस्तार

## मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची दिल्लीत माहिती

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सध्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. तिथे वरिष्ठ नेत्यासह त्यांच्या भेटीगाठी सुरू आहेत. या दरम्यान मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकार परिषद घेऊन मंत्रिमंडळ विस्ताराबाबत महत्त्वपूर्ण माहिती दिली. १८ जून रोजी राष्ट्रपतीपदाची निवडणूक आहे. त्याआधीच मंत्रिमंडळ विस्तार होऊ शकतो, अशी माहिती या वेळी त्यांनी दिली.



मंत्रिमंडळाचा विस्तार अजूनही झालेला नाही. याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, आषाढी एकादशीची पुजा झाल्यानंतर याबाबत लवकरच सांगण्यात येईल, मात्र अधिवेशनाआधी मंत्र्यांचा शपथविधी होणार असल्याचे एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केले आहे. १८ जून रोजी राष्ट्रपतीपदाची निवडणूक आहे. त्याआधीच मंत्रिमंडळ विस्तार होऊ शकतो असाही कयास आहे. मुंबईत भेटून चर्चा करू आणि लवकरच या प्रश्नाचे उत्तर देऊ, असे एकनाथ शिंदे म्हणाले.

दिल्लीत वरिष्ठ नेत्यांच्या सदिच्छा भेटीला आम्ही आलो आहोत. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर या सदिच्छा भेटी होत्या. हा राजकिय दौरा नाही. लोकांच्या मनात होते तसे सरकार राज्यात स्थापन झाले आहे. भाजप-शिवसेना युतीचे जे सरकार अडीच वर्षांपूर्वी स्थापन व्हायला हवे ते आता आम्ही केले आहे. आमची जबाबदारी वाढली आहे. पाच वर्षे ज्यांनी खूप चांगले काम केले, शेतकरी आणि लोकहिताचे काम केले ते मधल्या काळात खंडीत झाले. ते आम्ही पुन्हा पुढे नेणार आहोत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

राज्याच्या विकासासाठी केंद्र सरकारच्या मदतीचेदेखील आवश्यक आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींचे महाराष्ट्रासंबंधीचे व्हीजन समजून घेणार आहोत. केंद्राची मदत मिळाल्यानंतर राज्य वेगाने प्रगती करते, असेही त्यांनी नमूद केले.

### खातेवाटपही तेव्हाच

उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितल्याप्रमाणे आम्ही दोघे आषाढी एकादशीची पुजा झाल्यानंतर मंत्रिमंडळ विस्ताराबाबत चर्चा करणार असून खातेवाटप निश्चित करू.

(छाया : सुधीर नाझरे)




# पंढरपुरात जमला भाविकांचा मेळा!

**पंढरपूर : प्रतिनिधी**

भगव्या पताकांची दाटी... ज्ञानोबा-तुकारामांचा जयघोष... टाळ-मृदंगाचा गजर... पावसाची संततधार... चिखलात नाचणारे वैष्णव... अशा भक्तिमय आणि चैतन्यमयी वातावरणात संत ज्ञानेश्वर महाराज, संत तुकाराम महाराज, सोपानदेव महाराज यांच्यासह अनेक संतांच्या पालख्यांसह लाखो भाविक पंढरीत विसावले आहेत. रविवारी (दि. १०) आषाढीनिमित्त आपल्या लाडक्या विठूरायाला डोळे भरून पाहणार आहेत.

गेल्या दोन वर्षांपासून कोरोनाच्या प्रादूर्भावामुळे आषाढी एकादशीची वारी झाली नाही, मात्र या वर्षी कोरोनाबाधितांची संख्या कमी झाल्याने पंढरपूरच्या विठूरायाच्या वारीला परवानगी देण्यात आली. त्यामुळे या वर्षीच्या वारीमध्ये वारकऱ्यांचा वेगळाच उत्साह पाहायला मिळत आहे. लाखोंच्या संख्येने वारकरी पंढरपुरात आपल्या लाडक्या विठूरायाला भेटण्यासाठी दाखल झाले आहेत. त्यामुळे पंढरपूरमध्ये जणू भक्तांचा मेळाच भरला आहे.

## पंतप्रधान मोदींचा वारकऱ्यांना खास संदेश

**सोलापूर : प्रतिनिधी**

कोरोनाचा प्रादूर्भाव काही अंशी कमी झाल्याने यंदाच्या आषाढी एकादशीच्या वारीचा उत्साह ओसंडून वाहत आहे. आषाढी एकादशीनिमित्त पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लाखो वारकरी आणि भाविकांना शुभेच्छा दिल्या आहेत. मोदींनी माढा लोकसभा मतदारसंघाचे खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्यामार्फत लिखित स्वरूपात विशेष संदेशासह शुभेच्छा दिल्या आहेत. माझी भगवान विठ्ठल देवावरची श्रद्धा अढळ आहे. शतकानुशतके चालत आलेल्या पताका-दिंडी, वारीकडे आजही जगातील सर्वांत जुनी आणि मोठी सामुहिक यात्रा म्हणून पाहिले जाते. वारकरी चळवळ ही आपल्या समृद्ध परंपरांचे प्रतिक आहे. दिंडी यात्रा ही भारताच्या शाश्वत शिकवणीचे प्रतीक आहे, जी आपल्याला आचरण आणि विचार शिकवते, असे सांगत मोदींनी आषाढी एकादशीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

## मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांनी घेतली पंतप्रधानांची भेट



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात दहा दिवसांच्या सत्तानाट्यानंतर शिवसेना नेते एकनाथ शिंदे आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी महाराष्ट्रात सरकार स्थापन केले आणि पहिल्यांदाच ते दिल्ली दरबारी गेले. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री यांनी शनिवारी (दि. ९) पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सदिच्छा भेट घेतली. **(पान २ वर...)**

## ‘नगर परिषद निवडणूक पुढे ढकलण्याची मागणी करणार’

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

नगर परिषदांच्या निवडणूक ओबीसी आरक्षणाशिवाय घेऊ नये. पावसाळ्यात निवडणूक घेऊ नये यासाठी निवडणूक आयोगाला विनंती करणार असल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले.

पावसाळ्यात कर्मचाऱ्यांची कमतरता भासते. त्यामुळे या निवडणूक पुढे ढकलण्याची मागणी करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

## निवडक

### कळवा येथे विहिरीत पोहताना युवकाचा मृत्यू

**ठाणे** : कळवा पारसिक हिल येथील कारगिल डोंगरावरील विहिरीमध्ये पोहताना नवी मुंबई दिघा येथील सुमित मनोज माळी या १७ वर्षीय युवकाचा बुडून मृत्यू झाला. तो आपल्या सहा मित्रांसोबत शुक्रवारी (दि. ८) पोहण्यासाठी गेला होता. शनिवारी (दि. ९) सकाळी १०.३० वाजण्याच्या सुमारास त्याचा मृतदेह विहीरीतून बाहेर काढण्यात आला. विहिरीच्या खोलीचा आणि पाण्याचा अंदाज न असल्याने तो बुडाला असावा अशी शक्यता वर्तविण्यात येत आहे.

### कार्ती चिदंबरम्‌च्या घरावर सीबीआयचे छापे

**चेन्नई :** काँग्रेस नेते कार्ती चिदंबरम् यांच्या घरावर केंद्रीय अन्वेशन ब्युरो अर्थात सीबीआयने छापे टाकले आहेत. चेन्नई येथील त्यांच्या घरी सीबीआयचे अधिकारी पोहचले आणि त्यांनी त्यांच्या घराची झडती घेतली. माजी केंद्रीय गृहमंत्री पी. चिदंबरम् यांचे ते पुत्र आहेत. यापूर्वीही कार्ती चिदंबरम् यांच्याशी संबंधित नऊ ठिकाणांवर मनी लॉण्डरिंगप्रकरणी सीबीआयने धाडी टाकल्या होत्या.

## सोलापूर जिल्ह्याला भूकंपाचे धक्के



४.६ रिश्टर स्केल तीव्रता

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील सोलापूर जिल्ह्यामध्ये शनिवारी (दि. ९) सकाळी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, सकाळी ६ वाजून २४ मिनिटांनी ४.६ रिश्टर स्केल तीव्रतेचा भूकंप आला. कोयनेच्या भूकंपमापन केंद्रावर चार रिश्टर स्केल भूकंपाच्या धक्क्याची नोंद झाली आहे.

भूकंपमापन केंद्रापासून १३६ किमी अंतरावर भूकंप झाल्याची नोंद झाली आहे. भूकंपामुळे जीवित किंवा वित्तहानीची अद्याप नोंद नाही. याबाबतचा अधिक तपास सध्या केला जात आहे. सोलापूरमध्ये भूकंपाचे सौम्य धक्के जाणवल्याची माहिती नागरिकांनी दिली आहे. सोलापूर जिल्ह्यानजीक असलेल्या कर्नाटक राज्यातील विजापूर जिल्ह्यात भूकंपाचा केंद्रबिंदू आहे. उत्तर कर्नाटकमध्ये ४.९ रिस्टर स्केल तीव्रतेचा भूकंप झाल्याची माहिती मिळाली आहे. भूकंप झाल्यानंतर कुठे काय घडलं आहे का? याची चौकशी जिल्हा प्रशासनाकडून केली जात आहे. जिल्हा प्रशासनाने या वृत्ताला दुजोरा दिला आहे.

## वीजपुरवठा खंडित; ट्रान्स हार्बर लोकल विस्कळीत

**नवी मुंबई : बातमीदार**

वीजपुरवठा खंडित झाल्याने ट्रान्स हार्बर लोकलसेवा शनिवारी (दि. ९) सकाळी विस्कळीत झाली होती. गर्दीची वेळ पाहून रेल्वेने तत्काळ ओव्हरहेड वायरचे काम करीत वीजपुरवठा पूर्ववत केला. त्यामुळे ट्रान्स हार्बर महामार्गावरील वाहतूक सुरळीत करण्यात रेल्वे प्रशासनास यश आले. ठाणे-वाशी आणि वाशी-ठाणे दोन्ही लोकल सुरळीत सुरू झाल्याचे रेल्वे प्रशासनाकडून सांगण्यात आले. या संदर्भात मध्य रेल्वेच्या मुख्य जनसंपर्क अधिकारी शिवाजी सुतार यांनी ट्वीट केले आहे.

# पनवेलच्या रोहिदास वाड्यात समाजमंदिराची उभारणी

## महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते लोकार्पण





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रोहिदास वाड्यात उभारण्यात आलेले समाजमंदिर हे महपालिका क्षेत्रातील एक महत्त्वाचे आणि प्रतिष्ठित अशी वास्तू येणाऱ्या काळात बनेल, असा विश्वास सभागृह नेते परेश ठाकूर यांनी व्यक्त केला.

शहरातील रोहिदास वाड्यात नव्याने उभारण्यात आलेल्या समाजमंदिराचा लोकार्पण सोहळा शुक्रवारी (दि. ८) आयोजित करण्यात आला होता. महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर आणि माजी नगरसेविका सुलोचना कल्याणकर यांच्या हस्ते या समाजमंदिराचे लोकार्पण करण्यात आले.

पनवेल महापालिकेचे सभागृह नेते परेश ठाकूर आणि नगरसेवक अनिल भगत यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे शहरातील रोहिदास वाड्यात समाजमंदिर उभारण्यात आले आहे. या समाजमंदिर उभारणीसाठी दोन कोटी ६२ लाख रुपयांचा निधी खर्च करण्यात आला असून यामध्ये वाचनालय, जीम, टेबल टेनिस, कॅरम बोर्ड तसेच सामाजिक कार्याक्रमांसाठी सभागृह उपलब्ध करण्यात आले आहे.

या लोकार्पण सोहळ्याला पनवेल महापालिकेचे नगरसेवक राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, शहर सरचिटणीस अमरिश मोकल, प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, रोहिदास समाजाचे अध्यक्ष लक्ष्मण कल्याणकर, शशिकांत मोहोकर, दिनकर गव्हाणकर, संजय जाधव, प्रवीण मोहोकर, रजनिश जाधव, यशवंत जाधव, तानाजी झुगे, मधुकर उरणकर, शांताराम कल्याणकर, प्रवीण दुमशीकर, राकेश जाधव, जिज्ञेश मोहोकर, सिद्धार्थ मोहिते यांच्यासह पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

दरम्यान, या मंदिरात बांधण्यात आलेल्या सभागृहाचे नगरसेविका दर्शना भोईर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.

## भातलावणी



पनवेल : सध्या पावसाने चांगलाच जोर धरला असल्याने तालुक्यात शेतीच्या कामांना वेग आला आहे. पावसाचे थेंब झेलत शेतकरी वर्ग भातलावणी करीत असल्याचे चित्र सगळीकडे पाहायला मिळत आहे.

## चांगू काना ठाकूर विद्यालयाच्या प्राचार्य इंदुमती घरत यांचे निधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या नवीन पनवेल येथील चांगू काना ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्य इंदुमती बाळाराम घरत यांचे शनिवारी (दि. ९) अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ५७ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर व सभागृह नेते परेश ठाकूर यांनी शोक व्यक्त करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

अत्यंत मनमिळावू आणि विद्यार्थ्यांशी आपुलकीने वागणाऱ्या तसेच शैक्षणिक क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रातही सक्रीय असलेल्या इंदुमती घरत यांच्या अचानक जाण्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर पनवेल शहरातील अमरधाम स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. या वेळी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहत त्यांना श्रद्धांजली वाहिली.

# अमरनाथ ढगफुटीतील मृतांचा आकडा वाढला

**अमरनाथ : वृत्तसंस्था**

अमरनाथ गुहेजवळ ढगफुटीमुळे अनेक लोक पुरात वाहून गेले. या घटनेत आतापर्यंत १६ जणांचा मृत्यू झाला आहे, तर सुमारे ४० लोक बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे.

### १६ जणांचा मृत्यू; ४० बेपत्ता

अपघातानंतर भारतीय लष्कर, एनडीआरएफ, आयटीबीपी, जम्मू-काश्मीर पोलिसांचे पथक बचावकार्य करीत आहेत. आतापर्यंत सुमारे १५ हजार लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे.

या घटनेत जखमी झालेल्या लोकांना तातडीने उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. एनडीआरएफचे डीजी अतुल करवाल यांनी सांगितले की, या दुर्घटनेत आतापर्यंत १६ जणांचा मृत्यू झाला असून सुमारे ४० लोक बेपत्ता असल्याचे सांगण्यात येत आहे. रात्री ४ वाजेपर्यंत बचावकार्य सुरू होते, मात्र पावसामुळे थांबावे लागल्याचे त्यांनी सांगितले. शनिवारी (दि. ९) सकाळी बचावकार्य पुन्हा सुरू करण्यात आले. लष्कराच्या मदतीने आतापर्यंत आठ जणांचे मृतदेह श्रीनगरला नेण्यात आले आहेत.

पुराच्या ढिगाऱ्याखाली दबलेल्या सैनिक आणि नागरिकांचा शोध घेण्यासाठी लष्कराकडून विशेष वॉल पेनिट्रेशन रडारचा वापर केला जात आहे. आतापर्यंत सुमारे १५ हजार लोकांना सुरक्षित बाहेर काढण्यात आले आहे.

# शिवसेनेत दोनच माणसे शिल्लक राहतील!

## भाजपचे ज्येष्ठ नेते रावसाहेब दानवे यांचा टोला



**मुंबई : प्रतिनिधी**

शिवसेनेत यापुढे दोनच माणसे शिल्लक राहतील असा टोला भाजपचे ज्येष्ठ नेते आणि रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना उद्देशून बोलताना लगावला आहे.

महाराष्ट्रात एकनाथ शिंदे आणि त्यांच्या समर्थक ३९ आमदारांनी भाजप सोबत जात महाराष्ट्रात शिंदे-फडणवीस सरकारची स्थापना केली. त्यानंतर एकनाथ शिंदे मुख्यमंत्री तर देवेंद्र फडणवीस उपमुख्यमंत्री झाले. त्यानंतर उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, संजय राऊत हे एका बाजूला शिवसेना कार्यकर्त्यांना जवळ करण्याचा प्रयत्न करत असताना शिंदे समर्थकांवरही टीकास्त्र सोडताना दिसत आहे. तशातच शिवसेनेतील अनेक नगरसेवकापासून खासदारापर्यंत सर्व जण शिंदे गटाला प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष पाठिंबा देताना दिसत आहेत. अशा परिस्थितीत, शिवसेनेत केवळ उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे हे दोनच जण शिल्लक राहतील असा टोला रावसाहेब दानवे यांनी या दरम्यान लगावला आहे.

दरम्यान, महाराष्ट्रात सरकार आल्याचा आनंद झाला. पुढील नगरपालिका, पंचायत समित्या, महापालिका निवडणुका आम्हीच जिंकू. गेल्या वेळी ९२ पैकी ८२ नगरपालिका एकट्या भाजपने जिंकल्या होत्या. त्यावेळी तर युतीही नव्हती, आता मुख्यमंत्री एकनाथ शिंदेही आमच्या सोबत आहेत. शिवसेनेत दोनच माणसे शिल्लक राहणार आहेत आणि ती म्हणजे उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे हे आहेत, अशा शब्दांत रावसाहेब दानवे यांनी टोला लगावला. शिवसेनेचे बारा खासदार आमच्या संपर्कात आहेत. येणाऱ्या काळात सर्व निवडणुका आम्ही जिंकू, जी राहिली आहे, त्या शिवसेनेचे काय होते ते बघा. येत्या निवडणुकांनंतर राज्याचे चित्र काय होते बघा. मुंबईसह कल्याण-डोंबिवली, ठाणे, नवी मुंबई, सोलापूर, औरंगाबाद, जळगाव अशा सर्वच महत्त्वाच्या महापालिका आम्ही जिंकणार असा आम्हाला विश्वास आहे, असेही दानवे म्हणाले.

# शिवसेना आता कधीही उभी राहणार नाही

## केंद्रीय मंत्री नारायण राणे यांची टीका



**सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

शिवसेना संपायला पक्षप्रमुख उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरेच जबाबदार असून, मुख्यमंत्री असताना त्यांना सरकार वाचवता आले नाही. यासारखे दुर्देव ते काय आता शिवसेना कदापी उभी राहणार नाही, अशी जोरदार टीका केंद्रीय मंत्री नारायण राणे यांनी केली. केंद्रीय मंत्री राणे हे गोव्यावरून कणकवलीकडे जात असताना सावंतवाडीत ते थांबले होते. या वेळी प्रसार माध्यमांशी त्यांनी संवाद साधला.

यावेळी जिल्हा बँक अध्यक्ष मनीष दळवी, संजू परब, अजय गोंदावले, लखम सावंत भोसले, बड्या कोरगावकर, मनोज नाईक, आनंद नेवगी, दिपाली भालेकर, उत्कर्षा सासोलकर, बंटी पुरोहित आदी उपस्थित होते.

राणे पुढे म्हणाले, मुख्यमंत्री असतना आमदार, खासदार यांना न भेटणे मंत्र्यांना तासन्तास ताटकळत उभे करून ठेवणे यामुळेच ठाकरे यांच्या बाबतचा रोष निर्माण झाला आहे. यामुळेच हे आमदार फुटले आहेत. संजय राऊत यांनी शिवसेनेला मागे न्यायचे काम केले आहे. ठाकरे यांना राणे यांना टार्गेट करणे हाच त्यांचा एकमेव उद्देश होता असेही राणे म्हणाले. आपण सांगितल्याप्रमाणे हे सरकार कोसळले असल्याचे त्यांनी सांगितले. आता महाराष्ट्र विकासाकडे वाटचाल करीत असून नवनवीन प्रकल्प राज्यात येतील मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व देवेंद्र फडणवीस हेच चांगले काम करतील असा आपणास विश्वास असल्याचेही ते म्हणाले.

# खासदार संजय राऊत यांनी मुंबईची काळजी करु नये

## भाजप नेते प्रवीण दरेकर यांचा इशारा

**मुंबई : प्रतिनिधी**

खासदार संजय राऊत यांनी मुंबईची काळजी करु नये असा इशारा भाजपचे नेते प्रवीण दरेकर यांनी दिला आहे. मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याची शिवसेनेशी भाजपने युती केल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला होता. यावर बोलताना दरेकर यांनी हा इशारा दिला आहे.

एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेतील ३९ आमदारांनी शिवसेनेला जोरदार धक्का दिला. त्यानंतर एकनाथ शिंदे यांना भाजपाच्या पाठिंब्याने मुख्यमंत्रिपद मिळाले. त्यानंतर मुख्यमंत्री शिंदे आणि समर्थक आमदारांवर शिवसेना पक्ष प्रमुख उद्धव ठाकरे, खासदार संजय



राऊत यांनी आरोपांच्या फैरी झाडल्या. दरम्यान, संजय राऊत हे एकनाथ शिंदेंसह त्यांच्या समर्थक आमदारांविरोधात आक्रमक झाले. शिवसेना नेते, माजी मंत्री आदित्य ठाकरे आणि शिवसेना नेते, खासदार संजय राऊत हे पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्त्यांचे मेळावे घेत आहेत. संजय राऊत हे सध्या नाशिक दौऱ्यावर आहेत. यावेळी त्यांनी शिंदे समर्थक आमदारांवर टीका केली आहे. मुंबईला महाराष्ट्रापासून तोडण्याची शिवसेनेशी भाजपने युती केल्याचा आरोप संजय राऊतांनी केला होता. यावर भाजपचे नेते प्रवीण दरेकर यांनी टीका केली आहे. शिवसेना मुळापासून संपविण्यासाठी संजय राऊत अशा प्रकारची व्यक्तव्य करीत आहेत. त्यामुळे शिवसेनेचे नुकसान होत आहे. शिवसेनेचे तुकडे होत आहे, याकडे राऊतांनी बघावे, मुंबईची काळजी करु नये, मुंबईला कुणी हिरावून घेणार नाही असे प्रवीण दरेकर म्हणाले. याचबरोबर, संजय राऊतांच्या आरोपांना गंभीर घेण्याची गरज नाही. संजय राऊतांचे विधानाला शून्य किंमत आहे. भाजप हा खूप मोठा पक्ष आहे. भाजपचा हात पकडून शिवसेना मोठी झाली आहे, असे प्रवीण दरेकर यांनी सांगितले.

# शाळकरी मुलीची आत्महत्या

**पुणे : प्रतिनिधी**

शाळकरी मुलीने चौदाव्या मजल्यावरुन उडी मारुन आत्महत्या केल्याची घटना हडपसर भागातील उच्चभ्रू सोसायटीत घडली. अवंतिका कुलशेखर (वय १७, रा. अमानोरा पार्क, हडपसर) असे आत्महत्या केलेल्या मुलीचे नाव आहे.

पुणे हडपसर येथील घटना

अवंतिका एका शाळेत शिक्षण घेत होती. तिचे आई-वडील पालक मेळाव्यासाठी शाळेत गेले होते आणि तिचा लहान भाऊ देखील त्यांच्याबरोबर शाळेत गेला होता. काही वेळानंतर तिचे आई-वडील घरी आले तेव्हा सदनिकेचा दरवाजा आतून बंद होता. यानंतर तिने चौदाव्या मजल्यावर असलेल्या सदनिकेतून उडी मारल्याचे उघडकीस आले. या घटनेची माहिती हडपसर पोलिसांना कळविण्यात आली.

# पुणे येथे आरटीओ अधिकाऱ्यांकडे एक कोटींची खंडणीची मागणी; आरोपीला अटक

**पुणे : प्रतिनिधी**

भावाने बनावट सही करुन गाडी विकल्याच्या प्रकरणात आरटीओ अधिकाऱ्यांना त्याने आरोपी केले. ही तक्रार मागे घेण्यासाठी तुम्ही एक कोटी रुपये गोळा करुन द्या, अशी खंडणी प्रादेशिक परिवहन अधिकाऱ्यांकडे केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणात सरकारी अधिकाऱ्यांवरील दोषारोप दाखल करण्यास लवकर परवानगी मिळावी, यासाठी त्याने सर्व अधिकाऱ्यांना ई मेल पाठविले असून त्यात अश्लील आणि अवमानकारक भाषा वापरली आहे. बंडगार्डन पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.

सचिन काशीनाथ गव्हाणे (रा. राजगुरुनगर) असे त्याचे नाव आहे. त्याच्या पत्नीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत प्रादेशिक परिवहन अधिकारी अजित शिंदे यांनी बंडगार्डन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार १० मे २०२१ ते २७ जून २०२२ दरम्यान घडला आहे. याबाबत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सचिन गव्हाणे याचा ट्रक त्याचा भाऊ समीर याने उपप्रादेशिक परिवहन कार्यालय पिंपरी चिंचवड येथे अर्ज करुन त्यावर सचिन याची स्वत:च सही करुन कागदपत्रे सादर केली. सचिन याची गाडी विशाल टाव्हरे याच्या नावे करुन दिली. याप्रकरणी सचिन याने भोसरी एमआयडीसी येथे फिर्याद दिली होती. त्यावरुन त्याचा भाऊ समीर व तसेच तत्कालीन सहायक परिवहन अधिकारी व इतर अधिकारी, कर्मचारी यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला.




२०१९मध्ये हा गुन्हा दाखल केला गेला आहे. याप्रकरणात पोलिसांनी तपास करुन परिवहन आयुक्त मुंबई यांच्याकडे दोषारोप दाखल करण्याची परवानगी बाबत प्रस्ताव सादर केला आहे. तो प्रलंबित आहे. याप्रकरणात सचिन याने वेगवेगळ्या कार्यालयामध्ये केलेल्या ई मेल व तक्रारी अर्जांमध्ये परिवहन अधिकारी व कर्मचारी विरुद्ध तक्रारी केल्या आहेत. तसेच दोषारोप दाखल करण्यास लवकर परवानगी द्यावी, यासाठी तो सातत्याने ई मेल करीत असतो. गेल्या वर्षीपासून त्याने फिर्यादी अजित शिंदे यांच्या कार्यालयात येऊन आपण अधिकारी व कर्मचारी यांच्याविरुद्ध केलेल्या तक्रारी बंद करण्यासाठी या अधिकारी व कर्मचारी यांच्याकडून १ कोटी रुपये घेऊन देण्यासाठी मागणी शिंदे यांच्याकडे केली. शिंदे यांनी सुरुवातीला त्याच्याकडे दुर्लक्ष केले. त्यानंतर ते यावर काही बोलत नाही, हे लक्षात आल्यावर त्याने स्वत:च ८५ लाख रुपये एकतर्फी रक्कम निश्चित करुन ही रक्कम फिर्यादी शिंदे यांनी गोळा करुन द्यावी, अशी वारंवार मागणी केली. शिंदे यांनी त्याला नकार दिला असता त्याने गव्हाणेला पुढे जाऊन तुमच्याविरुद्ध काय बोलायला लागेल, असे करु नका, अशी धमकी दिली. आरोपीला अटक केली.

# एपीएमसीत १५०० टन बटाट्याची आवक

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई एपीएमसी घाऊक कांदा बटाटा बाजारात गेल्या दोन ते तीन दिवसांपासून मोठ्या प्रमाणावर बटाट्याची आवक झाली आहे. एरवी २५ ते ३० गाडी आवक होणारी दोन ते तीन दिवसात तब्बल १५० गाडी बटाट्याची म्हणजे १५०० टन बटाट्याची आवक झाली आहे.

आषाढी एकादशीच्या तीन दिवस आधी मुंबई एपीएमसीमध्ये १५० गाडी बटाट्याची आवक झाली असून, तेवढ्याच पटीने बटाट्याचा उठावही होत असल्याचे दिसत आहे. दररोज किमान ५२ गाडी बटाटा विक्री झाल्याची माहिती घाऊक व्यापारी मनोहर तोतलानी यांनी दिली.

उपवासाच्या काळात बटाट्याला वाढती मागणी असते. किरकोळ व्यापाऱ्यांनी तीन दिवसात मोठ्या प्रमाणावर माल खरेदी केल्याचे तोतलानी यांनी सांगितले. घाऊक बाजारात २२ ते २६ रूपये किलो बटाट्याचे दर आहेत. तसेच किरकोळ बाजारात ३५ रूपये किलो दराने विक्री होत आहे. मध्य प्रदेश, उत्तर प्रदेश, गुजरात आदी राज्यातून बटाट्याची आवक होते. यामध्ये ज्योती बटाटा वाणाला अधिक मागणी असल्याचेही त्यांनी सांगितले.

# रोटरी क्लब पनवेलचा पदग्रहण समारंभ

**पनवेल : वार्ताहर**

रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रलच्या ३३ व्या अध्यक्षपदी लक्ष्मण पाटील यांची निवड रोटरी क्लब ऑफ पनवेल सेंट्रल क्लबच्या अध्यक्षपदी अमोल पेट्रोल पंपचे मालक लक्ष्मण पाटील यांनी मावळते अध्यक्ष डॉ. अभय गुरसाळे यांच्याकडून तर सचिवपदी अनिल ठकेकर यांनी संतोष घोडींदे यांच्याकडून पदभार स्विकारला.

या पदग्रहण समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिका सभागृह नेते परेश ठाकूर, रोटरी जिल्हा ३१३१चे नियोजित प्रांतपाल शीतल शहा, भारत पेट्रोलियमचे विभागीय प्रबंधक उमेश कुलकर्णी, माजी प्रांतपाल गिरीश गुणे आदी मान्यवरांसह परमपूज्य नारायण महाराज, श्रीक्षेत्र नारायणपूर येथील भक्तगण व लक्ष्मण पाटील यांचे सर्व कुटुंबीय उपस्थितीत होते. क्लबने मागील वर्षभरात केलेल्या कामाचा अहवाल सचिव संतोष घोडींदे यांच्याद्वारे उपस्थितांसमोर सादर करण्यात आला.

या कार्यक्रमप्रसंगी रोटरी क्लबचे सदस्य व पनवेल महानगरपालिका सभागृह नेते नेते परेश ठाकूर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. तसेच अध्यक्ष लक्ष्मण पाटील यांनी पुढील वाटचालीबाबत आपले मनोगत व्यक्त केले.

प्रमुख पाहुणे शीतल शहा यांनी क्लबच्या कामगिरीचे कौतुक करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. या दिमाखदार सोहळ्याचे आयोजन विवेक खाडये यांच्या गुरुकृपा इव्हेंटस् या फर्मद्वारे करण्यात आले. यात प्रशांत पांडये व डॉ.अमोद दिवेकर यांनी मोलाचे सहकार्य दिले.



# एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या दूरस्थ शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमांना प्रवेश सुरु

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, दूरस्थ शिक्षण केंद्र अंतर्गत बी.ए., बी.कॉम., एम.ए., एम.कॉम. या दूरस्थ शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमांच्या प्रथम वर्षासाठीची प्रवेश प्रक्रिया https://sndtoa.digitaluniversity.ac/ या संकेत स्थळावर मंगळवार, दि. १२ जुलै २०२२ पासून ऑनलाईन पद्धतीने सुरु होत आहे. प्रवेशासाठी आवश्यक शैक्षणिक अर्हता आणि शैक्षणिक शुल्क याबाबतच्या तपशीलासाठी विद्यार्थिनींनी www.cde.sndt.ac.in या दूरस्थ शिक्षण केंद्राच्या अधिकृत संकेत स्थळाला भेट द्यावी. प्रवेश घेताना कोणत्याही प्रकारची शंका अथवा समस्या असल्यास श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, दूरस्थ शिक्षण केंद्र, सर विठ्ठलदास विद्याविहार,जुहू तारा रोड, सांताक्रूझ (प.), मुंबई - ४०० ०४९ येथे ०-२२ २६६०७७५८/ ०-२२-२६६०८१९३ या दूरध्वनी क्रमांकावर अथवा studentsupportcde.sndt.ac.in या ई-मेल आयडीवर संपर्क साधावा. ऑफलाइन पद्धतीने प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थिनी दूरस्थ शिक्षण केंद्रास भेट देऊन आपला प्रवेश निश्चित करू शकतात.

दूरस्थ शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या अनुसूचित जाती, इतर मागास प्रवर्ग, भटक्या जमाती व विमुक्त जाती, विशेष मागास प्रवर्ग या राखीव प्रवर्गातील विद्यार्थिनींना महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार भारत सरकारच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्तीचा लाभ प्राप्त होतो तसेच प्रवेश घेतलेल्या सर्व विद्यार्थिनींना अभ्यास साहित्य छापील तसेच ऑनलाईन माध्यमातून उपलब्ध करून दिले जाते. अभ्यासक्रमांच्या परीक्षेचे भाषा माध्यम हे मराठी, इंग्रजी आणि हिंदी असून परीक्षा केंद्र संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध आहेत. गृहिणी तसेच नोकरी करणाऱ्या अथवा उद्योजक महिलांना दूरस्थ शिक्षण केंद्राच्या अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊन आपले उच्च शिक्षण दूर व मुक्त अध्ययनाच्या माध्यामतूनपूर्ण करण्याची संधी श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठात उपलब्ध आहे अशी माहिती दूरस्थ शिक्षण केंद्राच्या संचालक डॉ. स्मृति भोसले यांनी दिली आहे.

पान १ वरून







# मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री पंतप्रधानांच्या भेटीला

या वेळी पंतप्रधान मोदी यांनी, सर्वसामान्यांच्या मनातील हे सरकार महाराष्ट्रात उभे राहिले आहे. त्यामुळे महाराष्ट्राच्या विकासासाठी आपण सर्वतोपरी सहकार्य करणार असल्याचे आश्वासन दिले.

यासोबतच गृहमंत्री अमित शहा, केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रपती रामनाथ कोविंद, भारतीय जनता पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा यांची सदिच्छा भेट घेतली. या वेळी या सर्व मान्यवरांना पंढरपूरच्या विठ्ठलाची मूर्ती भेट दिली. नवीन सरकार स्थापन झाल्यानंतर या सदिच्छा भेटी होत्या. हा राजकिय दौरा नाही. लोकांच्या मनात होते तसे सरकार राज्यात स्थापन झाले आहे. वरिष्ठ नेत्यांच्या सदिच्छा भेटीला आम्ही आलो आहोत, असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

# खांदा कॉलनी येथे रक्तदान शिबिर






**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक उपक्रम राबविण्यात उम्मीद फाउंडेशन ही नेहमीच अग्रेसर असते. या फाउंडेशनचे अध्यक्ष रोहित बैसाणे यांचा वाढदिवस शनिवारी रक्तदान शिबिर आयोजित करुन साजरा करण्यात आला. खांदाकॉलनी येथे उम्मीद फाऊंडेशन आणि एमजीएम हॉस्पिटलच्या सहकार्याने रक्तदान शिबिर आयोजित केले असून याला नागरीकांचा चांगला प्रतिसाद लाभला.

या वेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते रक्तदान केलेल्या रक्तदात्यांना प्रमाणपत्र देऊन त्यांना सन्मानीत करण्यात आले. या वेळी सामाजिक कार्यकर्ते युवराज बैसणे, उम्मीद फाऊंडेशनचे सचिव पवन कुलकर्णी, मिडीया हेड तौफीक मोहम्मद, अक्षय ठाकूर, रितीक जगे, आर्यन बंगेरा, प्रणय गडेराव, किशोर करांडे, राजू रोडे, मोहिर बैसाणे, वंशीका शेनाय यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. दरम्यान, उम्मीद फाउंडेशनच्या वतीने विविध कार्यक्रम राबविण्यात येत असतात.

## दुखवटा

# अर्जुन धोंडू शिर्के

**माणगाव :** माणगाव तालुक्यातील वावे गावातील अर्जुन धोंडू शिर्के



यांचे अल्पशा आजाराने त्यांच्या राहत्या घरी वावे येथे शुक्रवारी(दि. ८) सकाळी निधन झाले. मृत्यूसमयी त्यांचे वय ८१ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, तीन मुली, जावई, सून, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने शिर्के कुटुंबियांवर शोककळा पसरली आहे.

अर्जुन शिर्के हे शांत व संयमी स्वभावाचे व्यक्तिमत्व होते. समाजात त्यांची ओळख सर्वदूर होती. त्यांच्या निधनाचे वृत्त माणगाव तालुक्यात सर्वत्र समजताच अनेकांनी त्यांच्या राहत्या घरी वावे येथे येऊन त्यांचे अंत्यदर्शन घेतले.

# पनवेलमध्ये विकासकामांचे भूमिपूजन

## लेंडाळे तलाव सुशोभीकरणाचा शुभारंभ



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

अनेक दिवसांपासून प्रतिक्षेत असलेल्या पटेल मोहल्ल्यात असलेल्या लेंडाळे तलावाचे सुशोभीकरण होणार आहे. पनवेल महापालिकेच्या माध्यमातून हे काम करण्यात येत असून त्याचे भूमिपूजन नगरसेविका रूचिता लोंढे यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ८) झाले.



वडाळे तलावाप्रमाणेच लेंडाळे तलावाचे सुशोभीकरण व्हावे या करीता अनेक दिवसांपासून पाठपुरावा सुरू असून अखेर हे काम सुरू झाले आहे. या कामाच्या शुभारंभावेळी पनवेल महापालिका सभागृह नेते परेश ठाकूर, नगरसेवक मनोहर म्हात्रे, नितीन पाटील, राजू सोनी, मुकीद काझी, नगरसेविका दर्शना भोईर, प्रभाग क्रमांक १९ अध्यक्ष पवन सोनी, जवाद काझी, हरिश्चंद्र भगत, भाजप रायगड जिल्हा अल्पसंख्यांक मोर्चा सदस्य शावेझ रिझवी, पनवेल शहर अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष निसार सय्यद, अब्दुल बाकी काझी, इफ्तेखार सय्यद, इम्रान शेख, सुफियान पटेल, राजुभाई पटेल आदी कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

## भुमिगत मलनिःसारण वाहिन्या टाकण्याच्या कामाला सुरुवात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिका क्षेत्रातील पनवेल शहरात आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि सभागृह परेश ठाकूर व नगरसेवक अनिल भगत यांच्या पाठपुराव्यामुळे अनेक विकासाची कामे मार्गी लागली आहे. त्यानुसार तीन कोटी ५२ लाख ४५ हजार ४६४ रुपयांच्या भुमिगत मलनिःसारण वाहिन्या नव्याने टाकण्याच्या कामाचा शुभारंभ झाला आहे. या कामाचे भूमिपूजन महापौर डॉ. कविता चौतमोल यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ८) झाले.

पनवेल शहरातील मिरची गल्ली, बागवान मोहल्ला, पांजरपोळ ते पटेल मोहल्ल्या परिसरात भुमिगत वाहिन्या टाकण्यात येणार आहे. या वेळी या वेळी पनवेल महापालिकेचे नगरसेवक अनिल भगत, राजू सोनी, नगरसेविका दर्शना भोईर, रूचिता लोंढे, शहर सरचिटणीस अमरीश मोकल, प्रभाग क्रमांक १९ चे अध्यक्ष पवन सोनी, रोहिदास समाजाचे अध्यक्ष लक्ष्मण कल्याणकर, शशिकांत मोहोकर, दिनकर गव्हाणकर, संजय जाधव, प्रवीण मोहोकर, रजणीश जाधव, यशवंत जाधव, ताणाजी झुगे, मधुकर उरणकर, शांताराम कल्याणकर, प्रवीण दुम्शीकर, राकेश जाधव, जिझेश मोहोकर, सिद्धार्थ मोहिते आदी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.



## खारघरमध्ये गार्डनच्या कामाचा शुभारंभ

### आमदार प्रशांत ठाकूर यांची प्रमुख उपस्थिती



**खारघर : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका प्रभाग ५चे नगरसेवक शत्रुघ्न अंबाजी काकडे यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून खारघर सेक्टर ५ प्लॉट नंबर १९ व १०च्या गार्डनचे भूमिपूजन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले.

या वेळी पनवेल महानगरपालिका महिला व बालकल्याण सभापती हर्षदा उपाध्याय, नगरसेवक रामजी बेरा, खारघर शहर अध्यक्ष ब्रिजेश पटेल, सरचिटणीस कीर्ती नवघरे, संजय घरत, गुरुनाथ गायकर, उद्योग आघाडी संयोजक राजेंद्र मामा मांजरेकर, सोशल मीडिया संयोजक अजय माळी, प्रभाग ४ चे अध्यक्ष वासुदेव पाटील, युवा सरचिटणीस अमर उपाध्याय, उद्योग आघाडी सहसंयोजक प्रशांत सूर्या दुडम, शोभा मिश्रा, जलपा शास्त्री, अलका सुमन, कल्पना गांधी, प्रीति सिंह, प्रभा सिंह, विजय भोसले, रवींद्र काकडे, आकाश काकडे, पवन कांबळे, गिरीश गुप्ता, शैलेंद्र त्रिपाठी तसेच सेक्टर ५ ज्येष्ठ नागरिक संघटनाचे पदाधिकारी उपस्थित होते.

## खारघरच्या रामशेठ ठाकूर महाविद्यालयात ओरेएनटेशन प्रोग्राम

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघरमधील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात उघोजकता कौशल्य विकास कक्ष व आय.क्यू.ए.सी यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (दि. ९) ओरेएनटेशन प्रोग्राम घेण्यात आला.

यासाठी 'पाथब्रेकर्ज' या संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी महाविद्यालयातील सर्व शाखेच्या विद्यार्थ्यांना वेगवेगळ्या कोर्सची माहिती व मार्गदर्शन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. रूपेंद्र गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली प्रा. रूपाली नगारेकर (समन्वयक कौशल्य विकासकक्ष) प्रा. महेश्वरी झिरपे व सर्व प्राध्यापक वृंद व कर्मचारी वर्ग या सर्वांनी ओरेएनटेशन प्रोग्राम यशस्वी केला.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रा. राहुल कांबळे व प्रा. रूपाली नगारेकर यांनी सर्वाचे आभार व्यक्त केले. ओरेएनटेशन प्रोग्रामचे यशस्वीरीत्या आयोजन केल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख व संस्थेचे सचिव डॉ. सिदेश्वर गडदे यांनी आयोजकांचे खूप कौतुक केले.





**पनवेल : श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या वतीने चिंचवली शाळेतील मुलांना वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले. या वेळी माजी उपसरपंच परशुराम रिकामे, फुलचंद पाटील, दत्तात्रेय लहू मुंढे, ठोंबरे, तुकाराम मुंढे, बाळकृष्ण बोलाडे, ज्ञानेश्वर बडेकर, संतोष मुंढे, दिनेश पाटील, नरेश रिकामे, संतोष दिसले, सुनिल मुंढे, चोचे सर, ठाकरे सर आदी उपस्थित होते.**



**उलवे नोड : लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब पुरस्कृत भाजप महिला मोर्चा उलवे नोड यांच्यातर्फे चालविण्यात येत असलेल्या योगा अभ्यास केंद्रामध्ये आषाढी एकादशीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भाजप महिला मोर्चा उलवे नोड अध्यक्ष योगिता भगत यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात योगा शिक्षिका स्वाती खरे यांच्यासह योगा शिष्या उपस्थित होत्या.**

## मोहा शाळेत वह्यांचे मोफत वाटप


**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ व भाजप उलवे नोड यांच्या संयुक्त विद्यमाने रायगड जिल्हा परिषदेच्या मोहा कोळीवाडा येथील शाळेत वह्यांचे मोफत वाटप करण्यात आले.

या वेळी तरघरचे सरपंच सविता कोळी, वहाळचे उपसरपंच अमर म्हात्रे, सदस्य वितेष म्हात्रे, भाजप युवा मोर्चा अध्यक्ष निलेश खारकर, सरचिटणीस धीरज ओवळेकर, बामणडोंगरी गाव अध्यक्ष नंदकुमार ठाकूर, वहाळ गाव अध्यक्ष प्रवीण ठाकूर, उलवे नोड उपाध्यक्ष समृद्धी अडसुळे, भाजप नेत्या आरती तिवारी, मोहा गाव अध्यक्ष विक्रम कोळी, मार्गदर्शक महादेव कोळी, आदर्श नागरिक लक्ष्मण कोळी, युवा नेते जयेंद्र कोळी, भाजप नेते मच्छींद्र कोळी, शुभम म्हात्रे आदी उपस्थित होते.



## पिरकोनमधील रस्त्याची डागडुजी



**उरण : वार्ताहर**

पिरकोन गावातील मुख्य रोड हा आवरे, गोवठणे, पाले व उरण पूर्व विभागातील येणाऱ्या नागरिकांचा रहदारीचा मुख्य रस्त्यावर दोन ठिकाणी मोठमोठे खड्डे पडले होते. येथील लोकांना प्रवास करताना भरपूर त्रास होत असे. सतत सहा महिने पाठपुरावा केल्यानंतर पीडबल्यूडी अधिकारी पवार, सांगले रावसाहेब व खोपटे गावातील देवेंद्र पाटील यांनी स्वतः पाहणी करून हे खड्डे बुजविण्याचे काम पूर्ण केले. सध्या पावसामुले तातपुर्ते स्वरुपात काम केले.

पावसाळा थांबल्यावर लवकरच पाईप टाकून कायमस्वरूपी काम करन्यात येईल, असे या वेळी त्यांनी आश्वस्त केले. हे काम गोवठणे गावातील भारत पाटील, ॲड. जीत, विद्यानंद यांनी निदर्शनास आणले. काम होण्यासाठी भाजप उरण तालुका उपाध्यक्ष मुकुंद गावंड, स्वामी गावंड, सामाजिक कार्यकर्ते काशिनाथ गावंड, विलास गावंड, आवरे गावातील ज्येष्ठ नेते रत्नाकर म्हात्रे, दीपक पाटील आदींनी मेहनत घेतली.

## वाशी ते मुंबई बससेवा खारघरपर्यंत विस्तारित

### भाजप नेते ब्रिजेश पटेल यांच्या पाठपुराव्याला यश

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

बेस्टतर्फे वाशी ते मुंबई विमानतळ यादरम्यान देण्यात येणारी वातानुकूल एएस ८८१या क्रमांकाची बससेवा खारघरपर्यंत विस्तारीत करण्यात यावी, अशी मागणी भाजप खारघर-तळोजा मंडलचे अध्यक्ष ब्रिजेश पटेल यांनी केली होती. त्यांच्या या पाठपुराव्याला यश आले आहे, कारण बेस्टतर्फे सोमवार (दि. ११)पासून मुंबई विमानतळापर्यंतची बस खारघरपर्यंत सुरू होणार आहे.

ब्रिजेश पटेल यांनी बस सेवा विस्तारीत करण्याच्या मागणीचे पत्र पनवेलच्या महापौर डॉ. कविता चौतमोल यांना दिले होते. त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्तांना पत्राद्वारे बससेवा खारघरपर्यंत विस्तार करण्याचे सांगितले होते. त्यानुसार बेस्टतर्फे सोमवारपासून दोन प्रमुख बस मार्ग सुरू करणार येणार आहेत. यामध्ये पहिला मार्ग मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ ते खारघर आणि दुसरा मार्ग सीएसएमटी ते बॉम्बे हॉस्पिटल-चर्चगेट स्टेशन असा असणार आहे.

यासंदर्भात माहिती देताना प्रवक्ते मनोज वराडे म्हणाले की, दोन्ही मार्गांमुळे ऑफिसला जाणाऱ्यांना, फ्लायर्सना आणि इतर प्रवाशांना फायदा होईल. विमानतळावरून एसी मिडी बस संपूर्ण आठवडाभर धावेल आणि ९० मिनिटांच्या वारंवारतेवर चालेल. वाशीचे तिकीट १५० रुपये, सीवूडचे १७५ रुपये, सीबीडी बेलापूरचे २२५ रुपये आणि खारघरचे २५० रुपये असेल. बस क्रमांक ८८२ही सकाळी ४.१५, ६.१५, ८.१५, १०.१५ अशी प्रत्येक दोन तासांनी असणार आहे.

## गव्हाण विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री. छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त वृक्षदिंडी व विठ्ठल रखुमाई यांच्या प्रतिमांची पालखी मिरवणूक काढून वृक्ष संवर्धनाचा जयघोष केला.



सकाळी विद्यालयाच्या प्रांगणात विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी तथा समन्वय समितीचे सदस्य आणि जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी विठ्ठल रुखुमाईच्या प्रतिमा ठेवलेल्या पालखीचे पूजन करून वृक्षदिंडी मार्गस्थ केली.

तत्पूर्वी विद्यालयाच्या प्रांगणातून जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व टी. एन. घरत जुनिअर कॉलेज ऑफ सायन्सच्या विद्यार्थ्यांचीही वृक्षदिंडी मार्गस्थ झाली. विद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या प्रणिता गोळे व पर्यवेक्षक जोशी सर आणि सर्व सेवक वृंद या वेळी उपस्थित होता.



विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, ज्येष्ठ नेते जयवंतराव देशमुख, शिक्षक पालक संघाचे उपाध्यक्ष नामदेव ठाकूर, विद्यालयाच्या प्राचार्या साधना डोईफोडे, 'रयत'चे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, 'रयत'च्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, ज्युनिअर कॉलेज विभागप्रमुख प्रा. बाबुलाल पाटोळे तसेच दोन्ही शाखांचे सर्व शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विठ्ठल रखुमाई त्याचप्रमाणे संत मेळा आणि वारकऱ्यांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी डोक्यावर तुळशी व इतर रोपांच्या कुंड्या घेऊन वृक्षलागवड व वृक्षसंवर्धनाच्या घोषणा दिल्या. दीक्षा वर्तक व उपशिक्षिका हर्षला पाटील व विद्यार्थ्यांनी विठू नामाचा गजर आणि वृक्ष संवर्धनाचा संदेश देणाऱ्या गीतांचे गायन केले. वृक्षदिंडीची सांगता आरती आणि भजनांनी झाली. विद्यालयाचे ग्रंथपाल महेश म्हात्रे व क्रीडा शिक्षक जयराम ठाकूर यांनी आरती गायन केले.

## भाजप नेते सचिन पाटील यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमाने साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्षाचे पनवेल तालुका उपाध्यक्ष सचिन लक्ष्मण पाटील यांचा वाढदिवस शनिवारी (दि. ९) सामाजिक उपक्रम राबवून साजरा झाला. वाढदिवसानिमित्त नावडे येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील विद्यार्थ्यांना श्री रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सौजन्याने वह्यांचे तसेच खाऊचे वाटप भाजपचे पनवेल तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

या वेळी उपस्थितांनी सचिन पाटील यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. वह्यावाटप कार्यक्रमाच्या वेळी मदन कृष्णा खानावकर, शत्रूघ्न खानावकर, रमेश खानावकर, भालचंद्र खानावकर, अरुण गवळी, प्रकाश म्हात्रे, सुरेंद्र म्हात्रे, आकाश म्हात्रे, नारायण म्हात्रे, विशाल खानावकर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामस्थ आणि शिक्षक वृंद उपस्थित होते.







**पनवेल : भाजप तालुका उपाध्यक्ष सचिन लक्ष्मण पाटील यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर आणि भाजपचे जिल्हा उपाध्यक्ष प्रल्हाद केणी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी अरुण गवळी यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.**

# रेल्वेच्या विद्युतीकरणाचा वेग वाढविण्याचे महत्त्व

***डिझेलचा वापर कमी करून पर्यावरणपूरक विजेचा वापर वाढविण्यासाठी सध्या भारतीय रेल्वे प्रयत्नशील आहे. देशात रेल्वे मार्गांचे वेगाने होणारे विद्युतीकरण हा त्याचाच एक महत्त्वाचा भाग आहे. २०३० पर्यंत रेल्वे १०० टक्के हरित उर्जेवर चालविणे, असे महत्त्वाकांक्षी उद्दिष्ट सरकारने घेतले असून त्याची तयारी सध्या सर्वत्र चालू असल्याचे दिसत आहे.***

भारताचे आर्थिक गणित बिघडवणारा सर्वात मोठा घटक कोणता असेल तर तो इंधनाचा. आपल्याला ८५ टक्के इंधन आयात करावे लागते. त्यासाठी जे डॉलर खर्च करावे लागतात, त्यामुळे रुपयाच्या मूल्यात घसरण होते. इंधनाचे दर वाढले की अर्थव्यवस्थेतील इतर घटक चांगले काम करत असतानाही त्याचा फटका बसतो. हा धक्का कमी करण्याचा एक खात्रीचा मार्ग म्हणजे इंधनाचा वापर कमी करून विजेचा आणि त्यातही हरित उर्जेचा वापर वाढवत राहणे. सोलर पार्कच्या मार्गाने देश त्यासंबंधीची मोठी तयारी सध्या करतो आहे. डिझेलचा मोठा वापर करणारी भारतीय रेल्वे या संदर्भाने काय करते आहे, हे जाणून घेतले पाहिजे.

**रेल्वेचा डिझेल वापर अधिक**

दररोज अडीच कोटी प्रवासी, १३ हजार दररोज धावणाऱ्या गाड्या, ६८ हजार किलोमीटर लांबीचे मार्ग आणि ३३ दशलक्ष टन दररोजची मालवाहतूक करणाऱ्या भारतीय रेल्वेला लागणारे डिझेल किती असू शकते, याची कल्पना करा. अर्थातच कार्बन उत्सर्जन करण्यामध्ये रेल्वेचा मोठा वाटा आहे. ते कमी करण्याचा एकमेव मार्ग म्हणजे डिझेल इंजिन ऐवजी इलेक्ट्रीकल इंजिनांची संख्या वाढविणे. त्यासाठी अधिकाधिक रेल्वेमार्गाचे विद्युतीकरण करणे. हा बदल भारताच्या दृष्टीने महागडा आहे. मात्र त्याची निकड लक्षात घेता सरकारने त्यावर लक्ष केंद्रित केले असून रेल्वे विद्युतीकरणाचा वेग गेल्या काही दिवसात चांगलाच वाढला आहे.

**कोकण मार्ग १०० टक्के विजेवर**

गेल्या काही दिवसात आपल्या आजूबाजूला हा बदल दिसू लागला आहे. उदा. मुंबईत कोल्हापूर रेल्वे आता विजेवर धावू लागली आहे तर कोकण रेल्वे १०० टक्के विजेवर धावते आहे. (७४१ किलोमीटर– रोहा ते कर्नाटकातील थोकूर) देशभरातील अनेक मार्गांवर विद्युतीकरण पूर्ण झाल्याच्या बातम्या प्रसिद्ध होत आहेत. याचाच अर्थ असा की, या कामाने आता वेग घेतला आहे. त्याची प्रचीती पुढील आकडेवारीही देते. उदा. २००० मध्ये ५६.१ टक्के प्रवासी वाहतूक डिझेल इंजिनांनी होत होती, ते प्रमाण २०२० मध्ये ४३ टक्क्यांवर आले आहे. म्हणजे विजेच्या इंजिनांचा वापर याच काळात ४३.९ वरून ५७ टक्के झाला आहे. मालवाहतुकीत हा बदल अधिक झालेला दिसतो. गेल्या २० वर्षांत डिझेल इंजिनांचा वापर ४३.५ वरून ३५.३ टक्के इतका कमी झाला आहे, तर विजेच्या इंजिनांचा वापर ५६.५ वरून ६४.७ टक्के इतका वाढला आहे. २०३०पर्यंत भारतीय रेल्वेचे १०० टक्के विद्युतीकरण करण्याचे उद्दिष्ट सरकारने घेतले आहे. त्यातील प्रमुख मार्ग डिसेंबर २०२३ पर्यंतच पूर्ण केले जाणार आहेत. याचा अर्थ पुढील काळात रेल्वेत विजेचा वापर आणखी वेगाने वाढणार आहे.








**रेल्वेच्या जागांवर सौरपार्क**

मग प्रश्न असा उपस्थित होतो की, एवढ्या मोठ्या प्रमाणावर लागणारी वीज आणणार कोठून? २०२० मध्ये रेल्वेगाड्या चालविण्यासाठी रेल्वेने १८ हजार ४१० दशलक्ष युनिट तर स्थानकांवर तसेच इतर कारणांसाठी दोन हजार ३३८ दशलक्ष युनिट वीज वापरली. विजेची निर्मिती कोळश्यापासूनच होत राहिली आणि तीच वीज रेल्वे वापरत असेल तर कार्बन उत्सर्जन आणखी वाढणार. कारण सध्या तर आपली वीज कोळश्यापासूनच अधिक येते. यावर उपाय म्हणून रेल्वेने सौर उर्जा पार्कचे अनेक प्रकल्प हाती घेतले असून त्याच विजेवर रेल्वेचा पुढील काळात भर राहणार आहे. रेल्वेची स्थानके, कारशेड्स आणि रेल्वे मार्ग अशी प्रचंड जागा रेल्वेकडे आहे. त्या जागेचा वापर सौरपार्कसाठी केला जाणार आहे. तब्बल ९६० स्थानकांवर सौर पॅनेल बसविण्याचे काम सध्या सुरु आहे. दिल्ली जवळील साहिबाबाद आणि चेन्नई रेल्वे स्थानक ही त्याची मोठी उदाहरणे आहेत. ही वीज रेल्वे स्थानकातच वापरली जाणार आहे. मध्यप्रदेशातील बिना येथे रेल्वेने करार करून १.७ मेगावॅटचा सौर उर्जा प्रकल्प उभा केला आहे. या प्रकल्पात तयार होणारी वीज थेट रेल्वे ओव्हरहेडमध्ये टाकली जाते. हे तंत्रज्ञान केवळ भारतातच नव्हे तर जगात प्रथमच वापरले जात आहे.


अर्थ प्रहर



यमाजी मालकर
(ymalkar@gmail.com)


**विद्युतीकरणाच्या कामाला वेग**

रेल्वेचे विद्युतीकरण किती वेगाने होत आहे, याची आणखी काही आकडेवारी पाहण्यासारखी आहे. २०२० पूर्वीच्या तीन वर्षांत या कामावर २० हजार २६० कोटी रुपये खर्च झाले आहेत. त्यामुळे ७० टक्के ब्रॉडगेज मार्गांचे विद्युतीकरण याकाळात पूर्ण झाले आहे. सध्या एकूण ४५ हजार ८८१ किलोमीटर मार्गांचे विद्युतीकरण झाले आहे. त्यातील सहा हजार १५ किलोमीटर २०२०–२१मध्ये, चार हजार ८७ किलोमीटर १७–१८मध्ये, तर ५ हजार २७६ किलोमीटर १८–१९मध्ये तर चार हजार ३७८ किलोमीटर १९–२० मध्ये पूर्ण झाले आहे. यावरून या कामांच्या वेगाची कल्पना येते.

**विजेच्या इंजिनांचे अनेक फायदे**

***कार्बन उत्सर्जन कमी होते म्हणजे पर्यावरणाचे संरक्षण होते, या शिवाय विजेची इंजिन वापरण्याचे इतरही अनेक फायदे आहेत. उदा. डिझेलचा वापर कमी झाल्याने देशाचे आयात बील कमी होते. विजेच्या इंजिनांमुळे प्रवासी आणि मालवाहतूक वेगाने होते. डिझेल इंजिनांची देखभाल करण्यासाठी जेवढा खर्च लागतो, त्याच्या निम्म्याच खर्चात विजेच्या इंजिनांची देखभाल होते. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवाचे औचित्य साधून २०२३ च्या स्वातंत्र्यदिनी ७५ वंदे भारत गाड्या चालविण्याचे उद्दिष्ट पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जाहीर केले आहे. अशा अत्याधुनिक आणि वेगवान गाड्या चालविणे विजेच्या इंजिनांमुळेच शक्य होते.***

---



# सर्वाधिक नुकसान करतात ते बाजाराविषयीचे गैरसमजच!

***भारतीय गुंतवणूकदारांनी शेअरबाजारात गुंतवणूक केली पाहिजे, याविषयी दूमत नाही, मात्र जे आधीच मनात गैरसमज घेऊन बाजारात येतात, त्यांना बाजार धडा शिकवितो. त्यामुळे आपल्याला बाजारात काय करावयाचे आहे, याची स्पष्टता असणे फार महत्त्वाचे आहे. ही स्पष्टता तांत्रिक विश्लेषणामुळे येवू शकते.***

ज्या कंपन्यांचे शेअर्स घ्यायचे त्यांचा अभ्यास हा दोन प्रकारे करू शकतो तो म्हणजे फंडामेंटल ॲनालिसीस (मूलभूत विश्लेषण) व तांत्रिक विश्लेषण(टेक्निकल ॲनालिसीस). यापैकी फंडामेंटल ॲनालिसिस म्हणजे काय हे आपण मागील लेखांत थोडक्यात पाहिलेलेच आहे तर आता या टेक्निकल ॲनालिसिस(TA) बद्दल जाणून घेण्याआधी आपण बाजारामध्ये येणाऱ्यांची मानसिकता जाणून घेऊ म्हणजे टेक्निकल ॲनालिसिसचे महत्व अधोरेखित होईल. निश्चित कोणतीही शिस्तबद्ध ठोस योजना नसताना अनेक लोक शेअरबाजारात येतात ते खालील गोष्टींच्या आधारे :

**१) आजुबाजूचे घटक (बातम्या)–** अनेक लोक जागतिक परिस्थिती, कच्च्या तेलाच्या किमती, सरकारी धोरणं, कंपन्यांचे निकाल, आर्थिक आकडेवारी यांच्या अंदाजावर आपले गुंतवणुकीचे निर्णय घेतात, जे फसवे असू शकतात.

**२) लोकांच्या निर्णयानुसार स्वतःचे निर्णय–** अनेक लोक या अनुषंगानज वागतात की इतरांबरोबर तेदेखील गुंतवणूक करत असल्यानज त्यांना अनेक लोकांचा नैतिक पाठिंबा आहे कारण सर्व एकाच बोटीतून प्रवास करत आहेत त्यामुळं सर्वांचे जे होईल तेच माझे देखील होईल.

**३) टिप्स–** अनेक ब्रोकिंग हाऊसेस किंवा ॲडवायजर्स ग्राहकांच्या नफ्यावर नव्हे तर मिळणाऱ्या ब्रोकरेजवर अथवा फीवर लक्ष केंद्रित करत आहेत. म्हणून ते टिप्स देतात आणि व्यवहार करायला भाग पाडतात. फारच कमी ब्रोकर्स किंवा ॲडवायजर्स गुंतवणूकदारांच्या बाजूने विचार करत आहेत.

**४) अफवा–** अनेक लोक केवळ अफवांवर विश्वास ठेऊन आपली गुंतवणूक करतात. उदा. बॉम्बे वालेने ये शेयर लेने को बोला हैं... किंवा यह स्क्रिप चलाने वाले है.., ऑपरेटर के खास आदमी ने बोला अमदाबाद से... आज उपर के सर्किट में ले लो, लगातार १० सर्किट मारेगा उपरके...

**५) लोभ आणि भीती–** लोक एका मर्यादेपलीकडे घेतलेले शेअर्स सांभाळून स्टॉक ठेवतात किंवा कधीही पद्धतशीरपणे नफा पदरात पाडून घेत नाहीत. कोणतीच शिस्तबद्धता किंवा तंत्र नाही.

मी असे लोक पाहिले आहेत ज्यांनी त्यांचा केवळ १० महिन्यांत ५ पट झालेला पोर्टफोलिओ शॉर्टटर्म कॅपिटल गेन टॅक्स टाळण्यासाठी विकला नाही आणि नंतर बाजार कोसळल्यावर केवळ दीडपट नफ्यामध्ये तोच पोर्टफोलिओ विकावा लागला आणि त्यावर शॉर्टटर्म कॅपिटल गेन टॅक्सदेखील आकारला गेला. मराठीत शेअर बाजारासाठी एक म्हण आहे, लाभातून लोभात.

**६) आवाक्याबाहेरचे व्यवहार–** कधी कधी ब्रोकर्स गुंतवणूकदारांना इंट्रा डे ट्रेडिंगसाठी त्यांच्या गुंतवणुकीच्या ५ ते १० पट पोझिशन्स घेण्याची मुभा देतात. जास्त नफ्याच्या उद्देशाने असे व्यवहार केले जातात परंतु नुकसान झाल्यास तेदेखील अनेकपटीत असू शकते.




प्रसाद ल. भावे
sharpadvisers@gmail.com


**७) गैरशिस्त–** इंट्रा–डे साठी घेतलेली पोझिशन योग्य शिस्तीच्या अभावे थोडासा तोटा पदरात घेऊन व्यवहारपूर्ती न करता अशी पोझिशन दीर्घावधीसाठी डिलिव्हरी म्हणून घेतली जाते आणि इच्छा नसताना देखील सांभाळली जाते.

**८) काहीतरी व्यापार करण्याची प्रवृत्ती–** बरेच लोक इंट्रा–डे ट्रेडिंग करून पहिल्या अर्ध्या तासात जवळपास १०–२० हजार कमावतात. परंतु बहुतेक आवेशी लोक या ठिकाणी कधीच थांबत नाहीत. ते मिळवलेले २० हजार पणास लावून दिवसभर या प्रवृत्तीने व्यवहार करत राहतात की मिळाला तर अधिक फायदा अन्यथा नुकसान झाल्यास जे कमावलं त्यातूनच गमावलं जाईल.

**९) जलद पैसा–** लोकांची मानसिकता गुंतवणुकीपासून जुगारात बदलते, कारण त्यांना सहज व जलद पैसे कमवायचे आहेत जे फारसे शक्य नाही.

लक्षात ठेवा गुंतवणूक हे शास्त्र असून एक कलादेखील आहे.

**१०) नुकसान वसुली करा (सूड व्यवहार)–** सामान्यतः लोक त्यांचे झालेले पूर्वीचे नुकसान एकाच फटक्यात भरून काढण्यासाठी आवाक्याबाहेरची लीव्हरेज पोझिशन घेतात. पण या कृतीच्या दुसऱ्या धोकादायक बाजूचा ते कधीच विचार करत नाहीत की यावेळीही त्यांना पुन्हा तोटा झाल्यास काय होईल?

**११) नकारात्मक मानसिकता–** अनेकजण हीच भावना उराशी बाळगून शेअरबाजारात येतात की, मी घेतलेला शेअर खालीच येतो आणि विकल्यानंतर वरती.

नक्कीच टेक्निकल ॲनालिसिस या सर्वांवर उत्तम उपाय आहे.

**टेक्निकल ॲनालिसिसचे फायदे**

फंडामेंटल ॲनालिस्ट्स व टेक्निकल ॲनालिस्ट्स यामध्ये नेहमीच शीतद्वंद्व पाहावयास मिळते. प्रत्येकास आपला पाया अधिक प्रभावी वाटतो. माझे म्हणणे असते की, गुंतवणूक करताना एखादी चांगली कंपनी निवडण्यासाठी फंडामेंटल ॲनालिसिसचा आधार घ्यावा व अशा निवडलेल्या कंपनीचे शेअर्स कोणत्या भावात खरेदी करावेत यासाठी टेक्निकल ॲनालिस्ट्सचा आधार घ्यावा. नक्कीच तांत्रिक विश्लेषणाने आपल्याला या भावांचा अंदाज बांधता येतो की कोणत्या भावात एखादा शेअर खरेदी करावा अथवा विकून बाहेर पडावे.

१. टेक्निकल ॲनालिस्ट्सच्या सहाय्याने आपण कोणत्याही शेअर्ससाठी योग्य (अचूक नाही) प्रवेश पातळी (एन्ट्री लेव्हल) व निर्गमन पातळी (एक्झिट लेव्हल) ठरवू शकतो.

२. टेक्निकल ॲनालिस्ट्सचा एक मुख्य फायदा हा आहे की, एकदा का तुम्ही हे शिकलात की तुम्ही त्याचा वापर कोणत्याही असेट क्लास (शेअर्स, कमॉडीटी, करन्सी, इ.) मध्ये करू शकता. याउलट, फंडामेंटल ॲनालिसिसमध्ये शेअर्स घेण्यासाठी त्या कंपनीचा ताळेबंद, नफा–तोटा खाते उतारा, कॅशफ्लो स्टेटमेंट इ. गोष्टी अभ्यासाव्या लागतात तर सोन्याच्या खरेदीसाठी इतर बाजू तपासाव्या लागतात तर एखाद्या कृषीय वस्तूसाठी) वेगळ्याच प्रकारची माहिती वजा अभ्यास असणे गरजेचे ठरते.

३. बाजाराचा कल– तांत्रिक विश्लेषणाचा खास लाभ म्हणजे ट्रेडर्स व गुंतवणूकदारांना बाजाराचा अंदाज लावण्यास मदत होते आणि त्यानुसार आपले निर्णय घेण्यास मदत होते. या मुळे अभ्यासपूर्वक निर्णय घेणे गरजेचे असते.

---

## अर्थसाक्षर स्पर्धा : २६

**निकाल पुढीलप्रमाणे**

**प्रश्न क्र. १. टाटा उद्योग समूहातील सर्वात मोठ्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील कंपनीचे नाव काय आहे?**

***आ.*** टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस (टीसीएस)

**प्रश्न क्र. २. आपल्या देशातील सर्वाधिक बाजारमूल्य असलेली कंपनी कोणती?**

***अ.*** रिलायन्स इंडस्ट्रीज

**प्रश्न क्र. ३. शेअर बाजाराच्या सेन्सेक्स इंडेक्समध्ये किती कंपन्यांचा समावेश आहे?**

***आ.*** ३०

**अर्थसाक्षर स्पर्धा २६ ची बरोबर उत्तरे :**

**आलेल्या सर्व उत्तरांपैकी एका स्पर्धकाची उत्तरे बरोबर आली असून त्या विजेत्या स्पर्धकाचे नाव भरमा जयेंद्र हालोंडे. या स्पर्धकाला ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येत आहेत. त्यांनी सदर व्हाऊचर्स दुपारी २ ते ६ या वेळेत दैनिक राम प्रहरच्या कार्यालयातून घेऊन जावे. त्यांचे अभिनंदन!**

## राम प्रहर अर्थसाक्षर स्पर्धा : २७

**अर्थसाक्षर स्पर्धेचे तीन प्रश्न खाली दिले आहेत.**

**वाचक स्पर्धकांनी निवडलेली बरोबर उत्तरे पुढील पाच दिवसांत म्हणजेच गुरुवारी रात्री ८ वाजेपर्यंत ‘राम प्रहर’च्या ७७३८१०६००९ या मोबाईल क्रमांकावर कळवावी (व्हॉट्सॲप, मेसेज अथवा malharnetwork2022@gmail.com यावर मेल केले तरी चालेल).**

**१. क्रिप्टो करन्सी तयार करताना कोणत्या तंत्रज्ञानाचा वापर केला जातो?**

***अ.*** ब्लॉकचेन ***आ.*** मेटा
***इ.*** गुगल ***ई.*** फाईव जी

**२. भारतात टपाल कार्यालयांची एकूण संख्या किती आहे?**

***अ.*** दोन लाख ***आ.*** दीड लाख
***इ.*** एक लाख ***ई.*** चार लाख

**३. स्वातंत्र्याच्या अमृतमहोत्सवानिमित्त म्हणजे २०२३ च्या स्वातंत्र्यदिनीकोणत्या ७५ रेल्वेगाड्या सुरु करण्याची घोषणा पंतप्रधानांनी केली आहे?**

***अ.*** राजधानी ***आ.*** तेजस
***इ.*** हमसफर ***ई.*** वंदे भारत






**टीप : वरील तीनही प्रश्नांची अचूक उत्तरे देणाऱ्या वाचकांमधून पहिल्या तीन क्रमांकांची निवड संगणक प्रणालीने करण्यात येईल. या तीनही विजयी वाचकांना पनवेल, टपाल नाका येथील ‘ई–स्टोर इंडिया’तर्फे गिफ्ट व्हाऊचर्स देण्यात येतील, तसेच सर्व विजयी वाचक स्पर्धकांची नावे पुढील रविवारी अर्थ प्रहर सदरात जाहीर करण्यात येतील.**

**...तर मग चला लागा तयारीला आणि अर्थसाक्षर स्पर्धेत यशस्वी व्हा!**

## नैसर्गिक नाल्याचा मार्ग बदलल्याने

# कडाव परिसरातील शेती पाण्याखाली

**कर्जत : बातमीदार**

तालुक्याच्या कड़ाव भागातील एका फार्महाऊस मालकाने मातीचा भराव करून नैसर्गिक नाल्याचा मार्ग बदलल्याने स्थानिकांच्या शेतात पाणी शिरले आहे. त्यामुळे शेतात उगवलेली भाताची रोपे कुजून जाण्याची शक्यता निर्माण झाली आहे.



(छाया : संतोष पेरणे)



कर्जत तालुक्यातील कडाव परिसरातील सर्वे नंबर ८३/२ या जमिनीत काही महिन्यांपुर्वी मातीचा भराव करण्यात आला आहे. हा भराव करताना जागा मालकाने परिसरातील शेतांतील पाणी वाहून जाणाऱ्या नैसर्गिक मार्गावर लहान आकाराचे पाईप टाकले. त्यामुळे पावसाळ्यात भातशेतीचे नुकसान होईल, असे लेखी पत्र आजुबाजुच्या शेतकऱ्यांनी जानेवारी २०२२ मध्ये कडाव ग्रामपंचायतीला दिले होते.

कडाव परिसरात गेल्या काही दिवसांपासून जोरदार पाऊस पडत आहे. पावसाचे पाणी वाहून नेणारा नैसर्गिक मार्ग बंद झाल्यामुळे सर्वे नंबर ८३/२ परिसरातील शेतांना तलावाचे स्वरूप प्राप्त झाले आहे. त्यामुळे शेतात उगवलेली भाताची रोपे कुजून जाण्याची शक्यता आहे. तसेच पावसाच्या पाण्याबरोबर शेतांमध्ये चिखल, मातीसह वाळू वाहून आल्याने शेती नापीक होण्याची भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे येथील शेतकरी चिंतातूर झाले आहेत.

**“ जानेवारी महिन्यात सर्वे नंबर ८३/२मध्ये मातीच्या भरावाचे काम सुरू होते, त्यावेळी त्या परिसरातील आम्ही सर्व शेतकऱ्यांनी लेखी पत्र देऊन कडाव ग्रामपंचायतीला त्याची माहिती दिली होती. परंतु, कडाव ग्रामपंचायतीने काहीच कारवाई न केल्यामुळे आमच्या सर्व शेतीचे नुकसान झाले आहे. तरी शासनाने आम्हाला नुकसान भरपाई द्यावी.**

**–अजय हरिभाऊ गंगावणे, शेतकरी, कडाव, ता. कर्जत**

**“ मातीचा भराव करणाऱ्या फार्महाऊस मालकाला आम्ही जानेवारी महिन्यातच नोटीस दिली होती. परंतु, त्यांनी काहीच कारवाई केली नसल्यामुळे आम्ही पुन्हा त्यांना नोटीस काढून कारवाई करू. तसेच सदर बाब तहसीलदार व प्रांत यांनादेखील कळवत आहोत.**

**–अशोक किसन पवार, सरपंच, ग्रामपंचायत–कडाव**

## मुरूडमधील हनुमान मंदिराभोवती पाणीच पाणी

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील मारुती नाका परिसरातील रस्ते उंच झाल्याने येथील हनुमान मंदिराभोवती पावसाचे पाणी तुंबू लागले आहे. दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना या साचलेल्या पाण्याचा त्रास सहन करावा लागत आहे. सदरची समस्या दूर करावी, अशी मागणी मारुती नाका पाखाडी अध्यक्ष महेश मानकर यांनी मुरूड नगर परिषदेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

**भाविक त्रस्त**

मुरूड नगर परिषदेने काही दिवसांपूर्वीच शहरातील रस्त्यांची कामे पूर्ण केली आहेत. शहरातील मारुती नाका परिसरात तीन रस्ते एकत्र येतात. ते नवीन स्वरूपात तयार करताना रस्त्याची उंची वाढली. त्यामुळे या ठिकाणी पावसाचे पाणी साचून राहत आहेत. तसेच येथील गटारांची खोली वाढविणे आवश्यक आहे.

मुरूड शहरातील मारुती नाका परिसरात साचलेले पाणी वाहून जाण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्यात यावी, अशी लेखी मागणी येथील रहिवाशांनी नगर परिषदेकडे केली आहे.



(छाया : संजय करडे)

## मुरूड नगर परिषदेचा करभरणा आता ऑनलाइन

**मुरूड : प्रतिनिधी**

शहरातील नागरिकांना मालमत्ता कर, पाणीपट्टी आदी कर इंटरनेट बँकींगद्वारे भरता यावेत, यासाठी मुरूड नगर परिषदेने http://murudjanjiranagarparishad.in ही वेबसाईट विकसित केली आहे. त्यामुळे मुरूडमधील नागरिकांना आता ऑनलाइन करभरणा करणे शक्य होणार आहे.

नागरिकांनी सदर वेबसाईटवर मालमत्ता कर, पाणीपट्टी या पर्यायावर जाऊन आपला मालमत्ता क्रमांक, पाणीपट्टी क्रमांक अथवा नाव नमुद करावयाचे आहे. त्यानंतर त्यास इंटरनेट बँकींग, डेबिट कार्ड इत्यादी प्रकारे रकमेचा भरणा करणे शक्य होणार आहे व त्याची पावतीही ऑनलाईन प्राप्त होणार आहे. या वेबसाईटचा वापर करून शहरातील तसेच कामानिमित्त बाहेरगावी वास्तव्यास असलेल्या नागरिकांना करांचा भरणा वेळेत करणे सोईचे होणार असून, नागरिकांचा प्रत्यक्ष नगर परिषद कार्यालयात येण्याचा त्रास वाचणार आहे.

नागरिकांनी या सुविधेचा अधिकाधिक लाभ घ्यावा व आपल्या कर भरणा वेळेत करुन नगर परिषद प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन मुख्याधिकारी पंकज भुसे यांनी केले आहे.

## मुरूडमध्ये वृक्षारोपण

**मुरूड : प्रतिनिधी**

कृषीदिन सप्ताह निमित्ताने मुरूड पंचायत समिती कार्यालय परिसरात वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी उपयुक्त वृक्षांची लागवड करण्यात आली.

शासनाच्या निर्देशानुसार पावसाळी हंगामात जास्तीतीजास्त वृक्ष लागवड होणे क्रमप्राप्त आहे. त्या निर्देशाचे पालन करीत मुरूड पंचायत समितीने विविध ठिकाणी वृक्ष लागवड केली आहे. मुरूडचे गटविकास अधिकारी सुभाष वाणी, पंचायत समितीचे महिला व बालकल्याण उपमुख्य कार्यकारी अधिकारी नितीन मंडलिक, गटशिक्षणाधिकारी बाबुलाल पाखरे, कृषी अधिकारी मनिषा भुजबळ, कक्ष अधिकारी संजय वानखेडे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी सचिन मुनेश्वर, विस्तार अधिकारी संजय शेडगे, प्रशांत माळी, राखी खोपकर, समतादूत वैशाली पेरवे–खरपडे, सुर्वणा चांदोरकर, शुभांगी कोतवाल, रेखा बुल्लू यांच्यासह अधिकारी व कर्मचारी या वृक्षलागवड मोहिमेत सहभागी झाले होते.

## मेक कळसगिरी मोअर ग्रीन उपक्रमाला रोह्यातील संस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

(छाया : महादेव सरसंबे)



**रोहे : प्रतिनिधी**

तालुक्यातील सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन नुकताच मेक कळसगिरी मोअर ग्रीन हा उपक्रम राबविला. या वेळी सुमारे ६५ जणांनी तांबडी सवाणे परिसरात प्रत्येकी दिडशे बियांची लागवड केली. त्यामुळे अंदाजे दोन हजार झाडे रूजतील व कळसगिरी हिरवागार होण्यात मदत होईल असा अंदाज आहे.

सह्याद्रीच्या रांगांतील कळसगिरीला अधिक हिरवेगार करण्याच्या दृष्टीने रोह्यातील विविध सामाजिक संस्था दरवर्षी मेक कळसगिरी मोअर ग्रीन हा उपक्रम राबवतात. यंदा अॅड. हेमंत गांगल यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आलेल्या या उपक्रमात लायन्स क्लब रोहा, रोटरी क्लब रोहा, रोटरी क्लब रोहा सेंट्रल, सृष्टी प्रतिष्ठान, ब्राम्हण मंडळ रोहा, मेहेंदळे विद्या संकुल शिक्षक वृंद, सी. डी. देशमुख महाविद्यालय या संस्था सहभागी झाल्या होत्या. यंदाही करंज, खैर, आपटा, शिवण या भारतीय मूळ असलेल्या झाडांना प्राधान्य दिले असून या झाडांमुळे जमिनीमध्ये वाढलेले आम्ल कमी होण्यास मदत होणार आहे. प्रा. सुकुमार पाटील यांच्या कवितांनी कार्यक्रमाला वेगळा रंग भरला.

वनक्षेत्रपाल मनोज वाघमारे व त्यांचे सहकारी या वेळी उपस्थित होते. तालुक्याच्या इतर भागातही वनसंपदेसंबंधी उपक्रम घेतले तर त्यास पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन वाघमारे यांनी दिले.

## मोहोप्रे गावात जनावरांसाठी लसीकरण शिबिर

**महाड : प्रतिनिधी**

डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठ, दापोली संलग्न आचळोली कृषी महाविद्यालय आणि महाड पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या संयुक्त विद्यमाने मोहोप्रे येथे २९ जून रोजी जनावरांचे विशेष रोगप्रतिबंधक लसीकरण शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात एकूण ३०८ पशुधनांचे लसीकरण करण्यात आले.

वातावरणातील बदल, आद्रता, पाऊस यामुळे जनावरांना घटसर्प, लाळ्या, खुरकूत, देवी, अंतरविषारी आदि विविध आजारांची लागण होते. या आजारांवर उपाय म्हणून क्ष्त, एढत, ऋझ या लसींचा वापर करण्यात येतो. आचळोली कृषी महाविद्यालयाचे सहाय्यक प्राध्यापक एस. एस. संकपाळ यांच्या मार्गदशनाखाली कृषिकन्या प्रतीक्षा डोंगरदिवे, श्वेता जाधव, साक्षी गडहिरे, मायावती गेजगे, श्रुती घाग, सुमेधा देवरुखकर, निकिता जमदाडे, रसिका जमदाडे, ऋतुजा लोणकर यांनी मोहोप्रे येथे जनावरांसाठी विशेष रोगप्रतिबंधक लसीकरण शिबिर आयोजित केले होते. या शिबिरात ५१ गायी, २० शेळ्या, ३५ बैल, २०२ कुक्कुट असे एकूण ३०८ पशुधनांचे लसीकरण करण्यात आले.



(छाया : महेश शिंदे)

आचळोली कृषी महाविद्यालय प्राचार्य डॉ. व्ही. जे. गिम्हवणेकर यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या लसीकरण शिबिरास डॉ. एस. व्ही. कलगुडे (पशुवैद्यकीय पर्यवेक्षक, नाते), कृषी सहाय्यक प्रियंका सवणे, मोहोप्रे सरपंच ललिता म्हाके, कार्यक्रम समन्वयक प्रा. व्ही. आर. पवार, कार्यक्रम अधिकारी प्रा. एस. एस. दिवाळे, प्रा. ए. वाय. महाजन, डॉ. होळकर, प्रा. के. एस. निकम यांच्यासह मोहोप्रे गावातील पशुपालक आणि शेतकरी उपस्थित होते.

## वणवे येथे यंत्राद्वारे भातपिक लागवड

**अलिबाग :** खालापूर कृषी विभागाच्या वतीने वणवेतील कानिफनाथ पारठे यांच्या शेतावर तालुका कृषी अधिकारी अर्चना सूळ–नारनवरे यांच्या उपस्थितीत यंत्राद्वारे भातपिक लागवड प्रात्यक्षिक घेण्यात आले.


### जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्ट ‘अ’मध्ये वर्णन केलेली मिळकत प्रस्तावित **श्री. आदित्य गजानन पाटील** यांच्या मालकी हक्काची, ताबेकब्जातील व वहिवाटीतील असून मिळकतीचे एकूण क्षेत्र ०–४९–८० हे.आर. पॉ. मिळकत आमचे पक्षकार यांनी खरेदी करण्याचे ठरविले आहे. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरिता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :

**मिळकतीचे वर्णन**

**मौजे : नानोशी, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| गावाचे नाव | सर्वे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकारणी रु. पै. |
|---|---|---|---|---|
| नानोशी | २५ | ३ | ०–४४–७० पो.ख. ०–०५–१० | ४.१९ |
| | | **एकूण :** | **०–४९–८०** | |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्ट ‘अ’ मध्ये नमूद केलेल्या मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार–मदार, गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेकरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधितांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येऊन भेटावे. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरीतचे काम करतील व त्यानंतर आलेल्या तक्रारी दावे हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणीवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०६/०७/२०२२
ठिकाण : पनवेल

**सही /–**
**अॅड. महेश ग. भगत**
बी.ए.एल.एल.बी.
पत्ता : गुरुकृपा, प्लॉट नं. ६४बी,
नवीन पनवेल, तालुका पनवेल, जि. रायगड
फोन : ८६५२०३४७०३/८१०८१००१११


## अलिबागच्या कलाकारांनी साकारला चित्रपट ‘आषाढ’

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

अलिबागच्या कलाकारांनी संपूर्णतः अलिबागमध्येच बनवलेला आषाढ हा पूर्ण लांबीचा चित्रपट लवकरच रसिकांच्या भेटीस येऊ घातला आहे. मनिष अनसुरकर निर्मित, लिखीत व दिग्दर्शित आषाढ या चित्रपटाचा ट्रेलर, आषाढी एकादशी निमित्त विविध समाज माध्यमांवर प्रदर्शित होत आहे. अलिबाग परिसरातील चौल, नागावसारख्या निसर्गरम्य परिसरात चित्रीत केलेला आषाढ हा चित्रपट पंढरपूरच्या वारीची आगळी वेगळी कथा मांडतो.

वारी, विठ्ठलभक्ती, त्याकाळची नष्ट होऊ घातलेली खोत परंपरा, कोकणी लोकांचा देवभोळेपणा, प्रेमळ, माणसांतील नातेबंध आणि अखेर देव की दैव या प्रश्नावर गुंफलेले मनोवेधक कथानक म्हणजे आषाढ हा चित्रपट! सध्या हा चित्रपट विविध नामांकित चित्रपट महोत्सव आयोजकांकडून निमंत्रित होत आहे. विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात प्रदर्शित झाल्यानंतर मग हा चित्रपट प्रेक्षकांना पाहण्यास योग्य त्या माध्यमाद्वारे प्रदर्शित होईल असे या चित्रपटाचे छायाचित्रकार संदीप वाटवे यांनी सांगितले.



आषाढ या चित्रपटास रूढार्थाने कोणीही निर्माता नाही. अलिबागमधील नामांकित अनुभवी कलाकार, आणि तंत्रज्ञ हेच सर्व या कलाकृतीचे निर्माते आहेत. मयुरी स्वामी, ज्योती राऊळ, सागर नार्वेकर, श्रद्धा पोखरणकर, आनंद पाटील, चंद्रशेखर लिमये, विश्वास तांबोळी, वसुंधरा पोखरणकर, प्रकाश कवळे, गौरांगी पाटील आदी कलावंतांच्या अभिनयाने सजलेल्या आषाढ चित्रपटाची निर्मिती एक्स्प्रिमेंटल मुव्हीज या निर्मिती संस्थेतर्गत संदीप वाटवे फोटो अँड फिल्म्स यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आली आहे.

कर्तव्य मोकल यांचे संकलन. संदीप वाटवे, सिद्धांत पाटील यांचे उत्कृष्ट छायाचित्रण, शुभम म्हात्रे याचे सेटडिजाईन, हिमालय चोरघे निर्मिती सूत्रधार, सुनील म्हात्रे यांचे पार्श्वसंगीत व ध्वनी संयोजन, श्रद्धा पोखरणकर यांची पटकथा, सहदिग्दर्शन, वेशभूषा, रंगभूषा व पटकथा–संवाद सूचित पाटील, मेधा जोशी, विश्वास तांबोळी यांनी लिहिले आहेत.

संत ज्ञानेश्वर, संत चोखामेळा, संत सोयराबाई, संत तुकाराम आदी संतश्रेष्ठांच्या अभंगरचना मनिष अनसुरकर यांनी संगीतबद्ध केल्या असून, त्या प्रज्ञा अभंगे, सागर नार्वेकर, विशाल अभंगे, महेंद्र पाटील यांनी गायल्या आहेत.

सुशांत नाईक, मयुरेश सवतीरकर सहाय्यक छाया चित्रण, आणि मयूर शिंदे, शुभम पानपाटील, कुणाल तिर्लोटकर, राहुल अवचार यांची प्रकाश योजना, अमित पाटील निर्मिती व्यवस्थापन तर सुजित पाटील, प्रसाद लोध, नम्रता भगत, ऋतिक जैन, मयुरेश काबाले, संजय काबाले (चौल) यांनी निर्मिती सहाय्यक म्हणून काम केले आहे.

## कर्जतमध्ये विद्यार्थ्यांसाठी सायबर जागृती शिबिर

**कर्जत : प्रतिनिधी, बातमीदार**

रायगड चाइल्ड लाइन आणि कर्जत पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने अभिनव ज्ञान मंदिर कनिष्ठ महाविद्यालयात विद्यार्थ्यांसाठी सायबर जागृती व चाइल्ड लाइन मोफत सेवा या विषयावर मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

**मोफत मार्गदर्शन**

मुख्याध्यापक आनंद जोशी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. पोलीस निरीक्षक के. डी. कोल्हे यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना सायबर गुन्हे कसे घडतात? त्याची माध्यमे कोणती? आपल्या मोबाइलचा उपयोग किती आणि कसा करावा? सोशल मीडियाचा वापर करताना कोणती काळजी घ्यावी? याबाबत कोणते कायदे आहेत? तक्रार करताना कोणत्या समस्या निर्माण होतात? तक्रार वेळेत करणे कसे महत्त्वाचे आहे याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. त्यासाठी आवश्यक टोल फ्री क्रमांक ११२ बाबत माहिती दिली.

फोन ट्रॅकिंग मशीन कशाप्रकारे कार्य करते, त्यात कोणती माहिती मिळते? हे ठाणे अंमलदार आकाश राठोड यांनी प्रात्यक्षिकरित्या दाखवून दिले.

या वेळी दिशा केंद्राचे कर्मचारी जगदिश दगडे यांच्या मार्गदर्शनाखाली रेखा भालेराव यांनी रायगड चाइल्ड लाइनबाबत माहिती दिली तर समुपदेशक वैजयंती श्रीखंडे व माधुरी माळी यांनी चांगला स्पर्श, वाईट स्पर्श, वाढत्या वयोमानानुसार होणारे शारीरिक मानसिक बदल, घडणाऱ्या चुका व त्यासाठी घ्यायची खबरदारी याबाबत मार्गदर्शन केले. एका विद्यार्थिनीने या वेळी फोनवरून दिशा केंद्राविषयी माहिती जाणून घेतली व सर्वांना स्वतःच्या शब्दात समजावून सांगितली.


### TENDER NOTICE
### REDEVELOPMENT

Sealed Tenders are invited from reputed and capable Developers/Builders for Redevelopment of

**NANDANVAN CO. OP. HOUSING SOCIETY**

Reg. No. RGD/PWL/HSG/[TC]/531/89-90
Final Plot No. 228/5 Opposite Rupali Cinema, Panvel 410206, Dist. Raigad

AREA OF THE PLOT 646 SQ.MTR.

NO. OF MEMBERS : 10 RESIDENTIAL AND 4 SHOPS

The Society is holding all powers for Redevelopment and selection of Developer Tender Documents are available at :

Project Management Consultant's (PMC) Office at :

**RAHUL SASHTE & ASSOCIATES**

Shop No. 16 & 18, Shree-Ballaleshwar, Near Sawarkar Chowk, Old Panvel-410206, Mobile No. 9920330426

Cost of Tender : Rs. 1,000/- (NON REFUNDABLE)

By Cash / Pay Order / D.D. only Payable at Panvel in the name

**RAHUL SASHTE & ASSOCIATES**

Date of issue of tender document : 09-07-2022

Last date of submission : 16-07-2022 up to 5 PM

# नवी मुंबईत अतिवृष्टीमुळे यंत्रणा सतर्क

## पावसाळ्यातील नागरी कामांचा आढावा

**नवी मुंबई : बातमीदार**

पाऊस पडत असताना महानगरपालिकेच्या क्षेत्रीय अधिकारी यांनी आपापल्या कार्यक्षेत्रात उपस्थित राहून नागरिकांना कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही याची दक्षता घ्यावी व आवश्यक कार्यवाही करावी असे निर्देश महापालिका आयुक्त अभिजित बांगर यांनी दिले आहेत. त्यानुसार मागील तीन दिवसांपासून अतिवृष्टीच्या परिस्थितीशी सामना करण्यासाठी महानगरपालिका यंत्रणा सतर्कतेने काम करीत आहे.



महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापनाचा आढावा घेताना ६ जुलै रोजी रस्त्यांवरील खड्डे तातडीने भरण्याचे आदेश सर्व यंत्रणांना दिले होते. त्यास अनुसरून आयुक्त बांगर यांनी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात रस्त्यांवर खड्डे असल्यास ते त्वरित दुरुस्त करून घेण्याचे निर्देश अभियांत्रिकी विभागास दिले होते. त्यानुसार सर्वच विभागीय कार्यक्षेत्रात युध्द पातळीवर काम सुरू करण्यात आले असून आयुक्त बांगर यांनी शहरात विविध ठिकाणी सुरू असलेल्या कामांची प्रत्यक्ष पाहणी केली व खड्डे दुरुस्ती करणाऱ्या पथकांची संख्या वाढवून दोन्ही पाळ्यांमध्ये काम करण्याचे निर्देश दिले.

खड्डे दुरुस्ती कामांची पाहणी आयुक्त बांगर यांनी शहर अभियंता संजय देसाई यांच्यासह गुरुवारी केली. रस्त्यांवरील खड्डे बुजविण्यासाठी कोल्डमिक्स या अत्याधुनिक पध्दतीचा वापर महानगरपालिकेच्या वतीने केला जात असून काही ठिकाणी रेडिमेक्स काँक्रीटचाही वापर केला जात आहे. कोल्डमिक्स अथवा रेडीमिक्स काँक्रिटचा वापर करताना ते व्यवस्थितरित्या एकजीव होईल याची काळजी घ्यावी असे सूचित करतानाच खड्डे दुरुस्तीची सुरू असलेली कामे गुणवत्तापूर्ण करावीत व पुन्हा करावी लागणार नाहीत याची दक्षता घेण्याचे निर्देश आयुक्तांनी सर्व ठिकाणी दिले.

नागरिकांनी कोणत्याही मदतीसाठी महानगरपालिकेच्या आपल्या विभागातील आपत्ती निवारण कक्षाशी संपर्क साधावा अथवा महापालिका मुख्यालयातील मध्यवर्ती नियंत्रण कक्षाशी ०२२-२७५६७०६०/६१ या दूरध्वनी क्रमांकावर अथवा १८००२२२३०९/१० या टोल फ्री क्रमांकावर विनामूल्य संपर्क साधावा, असे आवाहन महापालिका आयुक्त बांगर यांच्या वतीने करण्यात येत आहे.

**रस्ते दुरुस्ती कामे होत असताना वाहतुकीला कोणत्याही प्रकारची अडचण होणार नाही याची दक्षता घ्यावी. दिवसाच्या कालावधीत मुख्य रस्त्यावरील वाहनांची वर्दळ लक्षात घेता त्याठिकाणची कामे परिस्थिती पाहून रात्री करावीत.**

**-अभिजित बांगर, आयुक्त, नवी मुंबई महापालिका**

# दांड-रसायनी रस्त्याची दुर्दशा

## नागरिक, वाहनचालक हैराण

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड-रसायनी रस्त्याची दुरवस्था झाली असून या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या वाहनचालकांमध्ये संतापाचे वातावरण दिसून येत आहे. या रस्त्याला पडलेल्या खड्ड्यांमुळे रस्त्यावरून वाहन चालविणे धोक्याचे झाले आहे. रस्त्याची चाळण झाल्याने नागरिक, वाहनचालक हैराण झाले आहेत.

दांड-रसायनी रस्ता काही वर्षांपूर्वी 'बांधा वापरा व हस्तांतरित करा'या तत्वावर भारत उद्योग लिमिटेड कंपनीला देण्यात आला होता. त्यामुळे या रस्त्याची देखभाल करण्याची जबाबदारी या कंपनीवर होती, मात्र काही कारणास्तव येथील टोलनाका सरकारने बंद केल्यामुळे या रस्त्यांची देखभाल करण्याची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे गेल्याने दुर्लक्ष होत राहिल्याने दांड-रसायनी रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसराकडे ये-जा करणाऱ्या अवजड वाहनांमुळे मोहोपाडा बँक ऑफ इंडिया समोर, मोहोपाडा प्रवेशद्वाराजवळ, रसायनी वृंदावन रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले आहेत.

या रस्त्यावरून वाहन चालविताना खड्डे चुकवित असताना अनेकांचा अपघात होवून नागरिक जखमी झाले आहेत. खड्ड्यामुळे अनेक वाहनांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे तर काही दुचाकीस्वारांना कंबरदुखीचा त्रास झाल्याचे दिसून येते. सार्वजनिक बांधकाम खात्याने दांड-रसायनी रस्त्याचे काम न आंदोलनाचा इशारा स्थानिक नागरिकांसह, पत्रकार राकेश खराडे यांनी दिला आहे.

**दांड-रसायनी रस्त्यालगतच्या नाल्यांतील सांडपाणी रस्त्यावर येत असल्याने रस्त्याला खड्डे पडले आहेत. याबाबत स्थानिक ग्रामपंचायतीशी पत्रव्यवहार झाला आहे. दांड रसायनी रस्त्यावरील समस्या सोडविण्यासाठी मार्ग काढू.**

**-धनाजी तिले, सार्वजनिक बांधकाम विभाग, पनवेल**



# साप दिसल्यास सर्पमित्रांना संपर्क करण्याचे आवाहन

**उरण : बातमीदार**

रायगड जिल्ह्यात काही दिवस मुसळधार पाऊस पडत आहे. उरण तालुक्यातही अधून मधून मुसळधार पाऊस पडत आहे. मुसळधार पावसामुळे नद्या नाले भरून वाहू लागले आहेत. पाण्याच्या प्रवाहात वाहून आलेली विषारी बिनविषारी साप मनुष्य वस्तीत आश्रय घेत आहेत. त्यामुळे विषारी-बिन विषारी सापांचे वन्य जीवांचे संरक्षण करणाऱ्या उरण तालुक्यातील फ्रेंड्स ऑफ नेचर या संस्थेने जनजागृती विषयक मोहीम हाती घेतली असून आपल्या परिसरात साप आढळल्यास सर्प मित्रांना फोन करून कळविण्याचे आवाहन केले आहे.

संस्थेचे सदस्य, कार्यकर्ते त्या सापांना पकडून त्यांना कोणत्याही प्रकारे इजा होऊ न देता जंगलात नेऊन सोडतात.साप दिसल्यास सदस्यांशी संपर्क करावे. यासाठी फ्रेंडस् ऑफ नेचर (फोन) व्हॉट्सअॅप हेल्पलाईन जयवंत ठाकूर ९५९४९६९७४७ / ९०२९५१३५७५ (चिरनेर), हिम्मत केणी ९९८७१८७१०७ (चिरनेर), राजेश पाटील ७७३८६२८५६२ (भोम चिरनेर), राकेश म्हात्रे ८४५११९८८३६० (भोम चिरनेर), विजय पाटील ८१०८८४८०५८ (मोठी जुई), गोरखनाथ म्हात्रे ९७६९७०५२९५ (पालेगाव), राकेश शिंदे ८६००५५७३८७ (सारडे), अविनाश गावंड ७७३८१२१९७१ (आवरे), प्रणव गावंड ९०८२६७०५१९ (आवरे), हृषिकेश म्हात्रे ९०८२९३५४०० (कडापे), मिलिंद म्हात्रे ९३२१२३४१७ (पेण), अनुज पाटील ८४५१०३०४८४ (टाकीगाव), निवृत्ती भोईर ९९३०८५८५९४ (धा. जुई), राहुल हणमंते ९८३३८२९३२८ (जेएनपीटी), रघु ९३२१२८७७७२ (उरण), किशोर पाटील ९१३७७५२०२१ (उरण), प्रितम पाटील ९१६७०९००७९ (उरण), जितेंद्र घरत ९८२०२२३२०१ (उरण), संजय पाटील ९२२४२७२६९३ (उरण), विवेक हुदली ७३०३३७७३३३ (बोकडविरा), सचिन घरत ९६०७२५९२३५ (खारपाडा), चरण पाटील ९५०३१४७५७६ (रावेगाव), देवेंद्र गुडीले ८६९२०४१२१२ (पनवेल), स्वप्निल ९६६४२५९४५९ (पिरकोन), प्रथमेश मोकल-८६००५८७४९५ (गुळसुंदे), तुषार कांबळे ८३७८०२१८११ (पोसरी), पियुष म्हात्रे ९९२०२१७९९३ (कोप्रोली) यांच्याशी संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# जप्तीच्या वाहनांचा लिलाव

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या वतीने कारवाई करून पकडण्यात आलेल्या वाहनांचा लिलाव २५ जुलै रोजी लिलाव करण्यात येणार आहे. या वाहनधारकांना वेळोवेळी सूचना देऊनही त्यांच्याकडून वाहन ताब्यात घेण्याबाबत कोणतीही कारवाई झालेली नसल्याने परिवहन विभागाच्या वतीने या वाहनांचा लिलाव करण्यात येणार आहे.


२५ जुलै रोजी सकाळी ११ वाजता ई टेडरिंग पद्धतीने जाहीर लिलाव करण्यात येणार आहे. नवी मुंबई येथील उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाने अटकावून ठवलेल्या ९९ वाहनांचा महाराष्ट्र वाहन कर कायदा १९५९ तसेच मोटार वाहन कायदा १९८८ मधील तरतूद वापरून अटकाव करण्यात आलेल्या वाहनांचा लिलाव करण्यात येणार आहे. इच्छुकांनी या लिलावात भाग घ्यावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी हेमांगिनी पाटील यांनी केले आहे.

# डॉक्टरच्या सतर्कतेमुळे वाहतूक पोलिसाचा जीव वाचला

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलमधील लाइफलाइन हॅस्पिटलच्या डायरेक्टर डॉ. जानवी पाटील यांच्या सतर्कतेमुळे वाहतूक पोलिसाचा जीव वाचला आहे.

डॉ. पाटील या खारघर कोपरा ब्रिज येथून आपल्या वाहनातून जात असताना एमएच ४६ बी झेड ६२९६ या क्रमांकाची कार एका वाहतूक शाखेच्या पोलीस कॉन्स्टेबल नामदेव गादेकर यांना बोनेटवर विरुद्ध दिशेने फरपटत नेत असल्याचे त्यांना दिसून आले. त्यामुळे त्यांनी या गाडीचा पाठलाग करून त्या वाहनाला कोपरा ब्रिजपासून स्वर्णागंगा ज्वेलरी शॉप खारघर म्हणजे जवळपास अर्धा किलोमीटर अंतर पाठलाग करून ट्राफिक पोलिसला फरपटत नेणाऱ्या गाडीच्या पुढे त्यांनी आपली आदी




नेऊन त्या कारचालकाची गाडी थांबवली.

या वेळी पाठीमागून धावत येणारे पोलीस नाईक निवृत्ती भोईर यांनी त्या ड्रायव्हरला ताब्यात घेऊन त्याला खारघर पोलीस स्टेशनमध्ये घेऊन गेले, तसेच पोलीस स्टेशनमधील स्टाफ ने डॉ. जानवी पाटील यांचे कौतुक करून मानवता दृष्टिकोन ठेवल्याबद्दल आभार मानले आहेत.



**खारघर : रेल्वे स्थानकापासून काही अंतरावर पुलाच्याखालील रस्त्यावर खड्डे पडलेले असून वरच्या मार्गावरील चेंबर खचला होता. यासंदर्भात भाजप नेते प्रभाकर घरत यांनी सिडको प्रशासनाकडे ऑनलाइन पत्रव्यवहार केला. त्यानुसार चेंबरच्या दुरूस्ती कामाला सुरुवात करण्यात आली.**

# उरण महाविद्यालयात एक दिवसीय कार्यशाळा

**उरण : बातमीदार**

कोकणात ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील वाणिज्य विभाग व अकाउंट अॅण्ड फायनान्स विभागाच्या वतीने अकाउंटन्सी मधील करिअरच्या संधी या विषयावर एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन केले गेले.



या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक व वक्ते डॉ. सी ए प्रदीप दत्तात्रेय कामठेकर (फायनान्स अॅण्ड अकाउंट ऑफिसर युनिव्हर्सिटी ऑफ मुंबई) हे होते. त्यांनी विद्यार्थ्यांनी स्वतः च्या क्षमता व आवड ओळखून करिअरची निवड केली पाहिजे, असे सांगून अकाउंटन्सी मधील करिअरच्या विविध संधी या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच महापुरुषांच्या जीवनातील विविध अनुभव चित्रित करून विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी आई-वडिलांचा सन्मान केला पाहिजे असे सांगितले.

महाविद्यालयाचे प्राचार्य प्रो. डॉ. बळीराम एन. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांनी यशस्वी होण्यासाठी आपल्या आवडीचे क्षेत्र निवडून त्यात यश प्राप्त केले पाहिजे व मेहनत करून मोठे झाले पाहिजे असे सांगितले. कार्यक्रमाचे आयोजन जेष्ठ प्राध्यापक मा. के.ए. शामा सर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ. पराग कारुळकर यांनी केला तर सूत्रसंचालन व आभार प्रा. हन्नज शेख यांनी केले. या वेळी पाहुण्यांच्या हस्ते प्रॅक्टिकल अकाउंटंट अँड टॅक्सेशन प्लस या अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना वितरित करण्यात आले. कार्यक्रमात राजेश पवार उपस्थित होते. कार्यशाळेला महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

# ढगफुटीत मृत्युमुखी झालेल्या यात्रेकरूंना पनवेलमध्ये श्रद्धांजली

**पनवेल : वार्ताहर**

दक्षिण काश्मीरमधील पवित्र अमरनाथ गुंफेच्या पायथ्याशी असलेल्या यात्रातळानजीक ढगफुटी झाल्याने सुमारे १६ जणांचा मृत्यू झाला असून ४० जण बेपत्ता आहेत. या अपघाताने मृत्युमुखी झालेल्या यात्रेकरूंना पनवेलच्या श्री अमरनाथ सेवा मंडळाकडून शोक व्यक्त केला आहे. मृत्युमुखी झालेल्या यात्रेकरूंच्या कुटूंबीयाच्या दुःखात सहभागी असल्याचे संस्थापक अध्यक्ष सुनील अचोलकर यांनी म्हटले आहे.

जम्मू काश्मीरमधील अमरनाथ गुंफेच्या परिसरात शुक्रवारी सायंकाळी भीषण ढगफुटी झाली. यात



ढगफुटीमुळे परिसरात पाण्याचे मोठे लोंढे तयार झाल्याने यात्रेसाठी आलेल्या भाविकांचे तंबू वाहून गेले तसेच सामुदायिक किचनचे प्रचंड नुकसान झाले आहे. तसेच भाविकांचा मृत्यू झाला आहे. या घटनेबाबत पनवेलच्या श्री अमरनाथ सेवा मंडळाने शोक व्यक्त केला आहे.

# मोहोपाड्यात विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्याचे वाटप



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रोटरी क्लब ऑफ पाताळगंगा आणि रोटरी क्लब ऑफ बॉम्बे बेव्ह्यू यांच्या संयुक्त विद्यमाने, रोटेरियन नवनिर्वाचित अध्यक्ष अमित शहा यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून, महिला उद्योग मंडळाची पूर्व प्राथमिक आणि प्राथमिक शाळा मोहोपाडा व जिल्हा परिषदेची प्राथमिक शाळा मोहोपाडा या दोन शाळांमधील अल्प उत्पन्न गटातील निवडक गरजू विद्यार्थ्यांना शालोपयोगी वस्तूच्या ७० आणि २५ संचांचे वाटप करण्यात आले.

या संचांमध्ये अनुक्रमे स्कूलबॅग, फूलस्केप वही, कंपास पेटीचा आणि स्कूलबॅग, २४ चार प्रकारच्या वह्या, छत्री, पावसाळी चप्पल, पिण्याच्या पाण्याची बाटली या वस्तूंचा समावेश होता.

या वेळी दोन्ही शाळांमधील पदाधिकारी, मुख्याध्यापक यांनी केलेल्या सहकार्याबद्दल दोन्ही क्लबांनी त्यांना धन्यवाद दिले. याच महिन्यात आणखी पाच शाळांमध्ये अशाच प्रकारच्या शालोपयोगी वस्तूंच्या संचांचे वाटप करण्यात येणार असल्याचे नवनिर्वाचित अध्यक्ष अमित शहा यांनी सांगितले.

या वेळी दोन्ही कार्यक्रमांना शाळांचे पदाधिकारी, मुख्याध्यापक आणि अध्यापक रोटरी क्लब पाताळगंगाचे माजी अध्यक्ष गणेश काळे, सुनील कुरूप, दीपक चौधरी, रमाकांत कोरडे, सुनील भोसले, बाळकृष्ण होनावळे, महिला साक्षरता समितीच्या अध्यक्षा मेरा कोरडे, नवनिर्वाचित पदाधिकारी अध्यक्ष अमित शहा, सचिव डॉ. धिरे जैन, खजिनदार देवेंद्र महिंद्रकर उपस्थित होते.

गुलाबपुष्प देऊन त्यांचे दोन्ही शाळांमधील पदाधिकाऱ्यांनी सहर्ष स्वागत केले. महिला उद्योग मंडळाचे पदाधिकारी अध्यक्ष, कार्याध्यक्ष, खजिनदार आणि मुख्याध्यापकांची कार्यक्रमास विशेष उपस्थिती लाभली.

# फुंडे हायस्कूलमध्ये वारकरी दिंडी



**उरण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उरण तालुक्यातील फुंडे येथील तुकाराम हरी वाजेकर विद्यालयात शनिवारी (दि. ९) आषाढी एकादशी निमित्त वारकरी दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. सर्व विद्यार्थी वारकरी वेशभूषेत विद्यालयात उपस्थित होते. ही दिंडी फुंडे हायस्कुल ते पागोटे गाव आणि परत पागोटे ते फुंडे हायस्कुल अशा रीतीने आयोजित करण्यात आली होती.

सुरवातीला सकाळी ठीक ८ वाजता विद्यालयाचे चेअरमन कृष्णाजी कडू, प्राचार्या सुनिता वर्तक, पर्यवेक्षक जी. सी. गोडगे, एस. जी. म्हात्रे, ऑफिस प्रमुख श्री. तुमडे या सर्वांच्या हस्ते विठ्ठलाच्या पालखीचे पूजन करण्यात आले. विद्यार्थी नचिकेत म्हात्रे याने विठ्ठलाचे अभंग सादर केले. मंदार म्हात्रे याने त्याला मृदुंगाची साथ दिली. त्यानंतर लेझीम पथक सादर करण्यात आले. हायस्कुलमधून दिंडीने पागोटे गावाकडे प्रस्थान केले. पागोटे गावातील हनुमंत मंदिरात पुन्हा एकदा अभंग गायनाचा कार्यक्रम झाला. फुंडे हायस्कुल स्कूल कमिटी सदस्य व पागोटे ग्रामपंचायत सरपंच, सर्व सदस्य आणि ग्रामस्थांनी ही दिंडी यशस्वी होण्यासाठी सहकार्य केले. ग्रामपंचायतीच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांना अल्पोपहार सुद्धा देण्यात आला. य

इयत्ता दहावी ३९; ब ३९च्या वर्गाने या कार्यक्रमाची अतिशय सुंदर तयारी केली होती. तसेच पाटील ए. एम. आणि देवरे मॅडम यांनी लेझीम पथकाची तयारी करून घेतली. सांस्कृतिक विभागप्रमुख एच. एन.पाटील सर्व आणि सर्व सेवक वृंद यांनी ही दिंडी यशस्वी होण्यासाठी मेहनत घेतली.

# रसायनीत वनविभागाच्या वतीने वृक्षारोपण कार्यक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

वनविभाग अलिबाग वनपरिक्षेत्र पनवेल, परिमंडळ वासांबे मोहोपाडा आणि पत्रकार बांधव यांच्या संयुक्त विद्यमाने रसायनीतील मौजे रिस परिसरातील सर्व्हे नंबर ६९/१ अ मधील पाच हेक्टर जागेत विविध जातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.

यात साग, जांभूळ,आवळा,खैर, कडूलिंब,करंद आदी जातींच्या ५०० वृक्षांची लागवड शनिवारी (दि. ९) रिस हद्दीतील वनपरिक्षेत्रात करण्यात आली. या वेळी माजी सरपंच कृष्णा पारंगे, पत्रकार राकेश खराडे, सम्यक सामाजिक संस्थेचे अध्यक्ष प्रकाश गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते सतिश महाडिक, श्याम म्हस्कर यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या वेळी औषधी झाडांच्या गुणधर्माविषयी वनरक्षक आनंद सावंत यांनी माहिती दिली.

वृक्षारोपणाच्या वेळी वनरक्षक व्हि. जी. कटवदे, वनरक्षक महेश चण्णागिरे, वनरक्षक स्वरांजली बांगर, निवृत्त वनरक्षक कांबळे, पत्रकार बांधव आदींसह वृक्षप्रेमी व ग्रामस्थ उपस्थित होते. या वेळी वनविभागाने झाडे लावा, झाडे जगवा, पर्यावरण वाचवा असे आवाहन केले.



# ग्रामरक्षक सुरक्षादल होणार पोलिसांचा 'तिसरा डोळा'

## ▪ अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत मापगावमध्ये पहिले दल स्थापन

**अलिबाग : प्रतिनिधी**

कायदा सुव्यवस्था सुरळीत ठेवण्याचे काम पोलीस यंत्रणा करीत असली तरी ती प्रत्येक गावाला सुरक्षा देऊ शकत नाही. त्यामुळे आपले गाव सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी तरुणांनी उचलणे महत्त्वाचे आहे. यासाठी पोलीस विभागाकडून प्रत्येक ग्रामपंचायत हद्दीत ग्रामरक्षक सुरक्षादल स्थापन केले जात आहे. हे दल गावात पोलिसांचा तिसरा डोळा म्हणून काम करणार आहे. अलिबाग पोलीस ठाणे हद्दीत ग्रामरक्षक सुरक्षादल स्थापन करण्याचा पहिला मान हा मापगाव गावाला मिळाला आहे. गावातील पंधरा होतकरू तरुण या दलात सहभागी झाले आहेत.




मापगाव ग्रुपग्रामपंचायत कार्यालयात अलिबाग पोलीस निरीक्षक शैलेश सणस याच्या हस्ते ग्रामरक्षक सुरक्षा दलातील पंधरा सदस्यांना ओळखपत्र आणि टी-शर्टचे वाटप करण्यात आले. मापगाव सरपंच उनिता थळे, मापगाव पोलीस पाटील, बहिरोळे पोलीस पाटील, माजी सरपंच सुनील थळे आदी मान्यवरांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम झाला. ग्रामरक्षक सुरक्षा दलाची कर्तव्ये याबाबत मोलाचे मार्गदर्शन करून आपत्ती कालावधीत नेहमी सतर्क राहून पोलीस ठाण्याच्या संपर्कात राहण्याबाबतच्या सूचनापोलीस निरीक्षक शैलेश सणस यांनी या दलाला दिल्या आहेत.

ग्रामरक्षक सुरक्षा दल हे गावाच्या सुरक्षेबाबत काम करणार आहे. नैसर्गिक आपत्ती काळात हे दल बचाव, मदत कार्यात सहभागी होईल. गावातील गुन्ह्याबद्दल पोलिसांना माहिती देऊन सहकार्य करतील. वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी या दलाचे सदस्य मदतीसाठी पुढे येतील. त्यामुळे गावाची सुरक्षा या दलाच्या माध्यमातून केली जाणार असून पोलिसांचा तिसरा डोळा म्हणून ते काम करतील. अशी माहिती शैलेश सणस यांनी या वेळी दिली. प्रत्येक गावात ग्रामरक्षक सुरक्षा दल स्थापन करण्यासाठी तरुणाईने पुढे येण्याचे आवाहनही पोलीस निरीक्षक शैलेश सणस यांनी केले आहे.

# सुधागड तालुक्यात भेरव येथे तरस आढळला

**पाली : रामप्रहर वृत्त**

सुधागड तालुक्यात भेरव गावाजवळ काही नागरिकांना तरस या प्राण्याचे दर्शन झाले. यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. शुक्रवारी (दि. ८) रात्री येथील तरुणाने भेरव गावाजवळील रस्त्यावर फिरणाऱ्या तरसाला पाहिले व त्याचा व्हिडीओ बनविला आहे.



हा व्हिडीओ अनेक व्हॉट्सअप ग्रुप व समाज माध्यमांवर फिरत आहे. या संदर्भात सुधागड वनक्षेत्रपाल रितेश नागोशे यांना विचारणा केली असता त्यांनी सांगितले की, वन्यजीव सहसा माणसावर हल्ला करत नाहीत. ते माणसापासून सुरक्षित अंतर पाळत असतात. माणूस त्यांच्या जवळ आला तर ते स्वरक्षणासाठी हल्ला करतात.

तरस हा श्वान प्रकारातील प्राणी आहे. त्याचबरोबर तरस जखमी असेल किंवा मादीसोबत पिल्लं असतील तरच ते माणसावर हल्ला करु शकते. त्यामुळे कोणीही घाबरून जाऊ नये असे आवाहनदेखील वनक्षेत्रपाल रितेश नागोशे यांनी केले.

# खंडित वीजपुरवठा पूर्ववत करण्यासाठी महावितरणची कसरत

## ▪ नदीच्या पाण्यातून नेले लोखंडी खांब; कर्मचाऱ्यांची कार्यतत्परता

(छाया : संतोष पेरणे)





**कर्जत : बातमीदार**

मुसळधार पावसात खोपोली-कर्जत मार्गालगतचे चार खांब कोसळमुळे कर्जत तालुक्यातील पळसदरी भागातील वीजपुरवठा खंडित झाला होता. महावितरणच्या कर्मचाऱ्यांनी पावसातही नवीन लोखंडी खांब नदीपलिकडे नेऊन उभे केल्यावर तीन दिवसानंतर त्या भागातील वीजपुरवठा पूर्ववत सुरू झाला. महावितरण कर्मचाऱ्यांच्या धाडस व मेहनतीचे कौतुक होत आहे.

खोपोली इन्कमरचा वीज प्रवाह वाहून नेणारे खोपोली-कर्जत मार्गालगतचे चार खांब मुसळधार पावसामुळे गुरुवारी (दि. ७) कोसळले होते. त्यामुळे पळसदरी भागातील अनेक गावांचा वीजपुरवठा खंडित झाला होता. ज्या ठिकाणी विजेचे खांब कोसळले होते तेथे नवीन खांब नेण्यासाठी नदी पार करावी लागणार होती. सध्या पावसामुळे नदी दुथडी भरून वाहत आहे. त्यामुळे या कार्यात अडथळे निर्माण झाले होते, मात्र वीजपुरवठा सुरु करणे गरजेचे असल्याने महावितरण कर्मचाऱ्यांच्या पथकाने चार नवीन लोखंडी खांब नदीपलीकडे नेण्याचा निर्णय घेतला.

महावितरणचे कर्जत विभागाचे अतिरीक्त कार्यकारी अभियंता प्रकाश देवके यांनी साहित्य व मनुष्यबळाचे योग्य नियोजन केले. महावितरण आणि ठेकेदाराचे अशा एकूण ३० कर्मचाऱ्यांनी युद्धपातळीवर कामाला सुरुवात केली. भर पावसात एकूण ४०० किलो वजनाचे लोखंडी खांब खांद्यावर या कर्मचाऱ्यांनी जोराबेन येथील नदी पार केली व नवीन विद्युत खांब उभे केले. या खांबांवरून वीजवाहिन्या टाकल्यावर पळसदरी भागातील गावांचा वीजपुरवठा पुर्ववत सुरू झाला होता. या कामाबद्दल महावितरणच्या भांडूप परिमंडळाचे मुख्य अभियंता धनंजय औढेंकर यांनी कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

# महाड परिसरात २६ ठिकाणी स्वयंचलित पर्जन्यमापक

## १४ ठिकाणी नदी पातळीमापक केंद्रांची उभारणी

**अलिबाग : प्रतिनिधी**

पावसाळ्यात महाड, पोलादपूर परिसराला पूर आणि भुस्खलन अशा आपत्तींना सामोरे जावे लागते. ही बाब लक्षात घेऊन जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाअंतर्गत महाड, पोलादपूर परिसरातील दरडप्रवण क्षेत्रात २६स्वयंचलित पर्जन्यमापक बसविण्यात आले आहेत. तर १४ ठिकाणी स्वयंचलित नदीपातळी मापक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे.

पावसाळ्यात महाड, पोलादपूर परिसराला पूर आणि भुस्खलन अशा आपत्तींना सामोरे जावे लागते. या परिसराचा भुवैज्ञानिकांकडून सर्वेक्षण करण्यात आला होता. यात दरडी कोसळण्यामागील प्रमुख कारण अतिवृष्टी असल्याची बाब समोर आली. एका अथवा लागोपाठच्या दिवसात ६०० मिलीमीटरहून अधिक पाऊस झाला तर दरडींचा धोका संभावत असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले होते. या पाश्वभूमीवर जिल्हाधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी पाऊले उचलली आहेत.



महाड, पोलादपूर परिसरात नाविन्यपुर्ण योजनेअंतर्गत २६ ठिकाणी स्वयंचलित पर्जन्यमापक बसविण्यात आले आहेत. त्यामुळे अतिवृष्टी झाल्यास त्याची अचूक आणि तात्काळ माहिती जिल्हा प्रशासनाला मिळणार आहे. आणि अतिवृष्टी झालेल्या ठिकाणी तातडीने उपाययोजना करणे शक्य होणार आहे. त्याचबरोबर नद्यांची पाणीपातळी मोजण्यासाठी जलसंपदा विभागा मार्फत १४ ठिकाणी स्वयंचलित पाणीपातळी मापक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली आहे. ज्यामुळे नद्यांच्या पाणीपातळीची अचूक माहिती प्रशासनाला मिळणार आहे. पूर परिस्थिती व्यवस्थापनासाठी याची मदत होणार आहे.

महाड परिसराला दरवर्षी पूर समस्येला तोंड द्यावे लागते. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने ही पाऊले उचलली आहे. महाबळेश्वर, पोलादपूर परिसरात झालेल्या पावसाचा थेट परिणाम महाड परिसरावर होत असतो. सावित्री नदीची पातळी वाढते आणि महाड शहरालगत पूरस्थिती निर्माण होते. या उपाययोजनांमुळे पर्जन्य परिस्थिती आणि नदी पातळीचा अचूक अनुमान बांधणे प्रशासनाला शक्य होणार आहे.

> **२००५ आणि २०२१ या दोन वर्षातील महापूर आणि दरडी कोसळण्याच्या घटनांचा अभ्यास करून, स्वयंचलित पर्जन्यमापक यंत्रणा आणि नदीपातळी मापक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आल्या आहेत. त्यामुळे पाऊस आणि पूर परिस्थितीचे अचूक अनुमान मिळू शकेल. आणि प्रतिबंधात्मक आपत्ती व्यवस्थापन करणे सुकर होऊ शकेल.**
> **-डॉ. पद्मश्री बैनाडे, निवासी उपजिल्हाधिकारी, रायगड**

# पावसाळी भूछत्रांची न्यारी दुनिया

**माणगाव : प्रतिनिधी**

पावसाळा सुरू झाला की रानमाळावर शेताच्या बांधावर, परसात, घराच्या पागोळी बाहेर लहान मोठ्या आकाराच्या छत्र्या म्हणजेच छत्र उगवलेले दिसतात. त्यांना कुत्र्याची छत्री, आलंबे, अळंबी अशा विविध नावाने ओळखले जाते. दिसायला आकर्षक व छत्रीच्या आकारासारखी पांढरे शुभ्र, काळसर, जाळीदार छत्रीसारखी, गदेच्या आकाराचे तर काही डिश अन्टेनासारख्या जाळीदार असतात. काही भूछत्रे खाण्यासाठी योग्य, काही औषधी तर बहुतांश विषारी असतात. भूछत्रांच्या जगभरात जवळपास दोन हजार जाती असून त्यातील फारच थोड्या जातींची घरगुती अथवा व्यापारी प्रमाणावर लागवड होते.

कोकणात साधारण आषाढ महिन्यात माळरानावर उगवणाऱ्या भूछत्रांचा खाण्यासाठी उपयोग केला जातो. आळंबी म्हणून ही भूछत्रे प्रसिद्ध आहेत. ही भूछत्रे काही तास, एक ते दोन दिवसांत पूर्ण उमलतात. ग्रामीण, शहरी भागात या भूछत्रांना चांगली मागणी असून शंभर ते दोनशे रुपये वाट्याने ती विकली जातात.

तर माळरानावर उगवणारी भूछत्रे विषारी असतात. गावांमध्ये, अडगळीच्या जागेत उगवणारी सर्वसाधारण वर्गातील भूछत्रे अतिविषारी नसली तरी त्यांचा खाण्यासाठी उपयोग होत नाही. लहान मुले या भूछत्रांचा उपयोग खेळण्यासाठी करतात. आषाढ महिन्यात उगवणाऱ्या भूछत्रांची सर्वसामान्यांना भूरळ पडत असून अतिशय स्वादिष्ट आरोग्यदायी म्हणून अनेकजण अळंबी खाण्याला पसंती देतात.

# कर्जतमध्ये गावरान मुठ्यांना वाढली मागणी

(छाया : संतोष पेरणे)



**कर्जत : बातमीदार**

पावसाळ्यात सुरुवातीचे काही दिवस खेकडा जातीचे मुठे हे मांसाहारी खाद्य आरोग्यवर्धक समजले जाते. जंगलात, शेताच्या बांधावर आणि माळरानावर बिळाबाहेर येणारे गावरान मुठे खरेदी करण्याकडे खवय्ये विशेष लक्ष देत असतात. दरम्यान, सध्या आरोग्यवर्धक गावरान मुठे कर्जत, नेरळच्या बाजारात विक्रीसाठी उपलब्ध असून ते खरेदी करण्यासाठी खवय्यांच्या उड्या पडत आहेत.

समुद्रातील मासेमारी बंद झाल्यामुळे चिकन आणि मटणाचे भाव वाढले आहेत. बिळात राहणारे मुठे, खेकडे पावसाळ्याच्या सुरूवातीस चारा गोळा करण्यासाठी बाहेर येतात. आरोग्यवर्धक गुणांमुळे नव्याने बाहेर पडणारे मुठे (चिंबोऱ्यांची एक जात) खवय्यांना आकर्षित करत आहेत. कोवळ्या गवतावर आणि पावसाच्या सुरुवातीलाच मिळणाऱ्या या चविष्ट मुठ्यांना मागणी वाढत आहे. रात्रीच्या वेळी रिमझिम पाऊस पडू लागल्यावर मुठे पकडण्यासाठी अनेकजण बाहेर पडतात. हातात गॅसबत्ती, टॉर्च किंवा जळता टायर, सोबत मुठे ठेवण्यासाठी सिमेंटची पोती किंवा गोणपाट असते. रात्रभर माळरान, शेत, गवताळ भाग किंवा डोंगर उतारावर फिरून मुठे पकडले जातात. बत्तीच्या किंवा टॉर्चच्या उजेडात हे मुठे थांबतात मग दबक्या पावलाने जाऊन त्यांना पकडून पोत्यात टाकले जाते.

इतर खेकड्यांपेक्षा आकाराने लहान असलेल्या मुठ्याचा रंग तजेलदार काळा व पिवळा असतो. पाठीचा भाग थोडा गोलाकार वर आलेला असतो. आकाराने लहान असले तरी त्याचे मांस चविष्ट व आरोग्यवर्धक असते. मुठे वेगवेगळ्या प्रकारे आणि पद्धतीने बनवून खाल्ले जातात. तांदूळ किंवा चण्याचे पिठ भरून शिजवलेल्या मुठ्यांचे कालवण चविष्ट आणि लज्जतदार लागते.

कर्जत, नेरळच्या बाजारात सध्या मुठ्यांचा भाव एक डजनला (१२ मुठे) १०० रुपये आहे. मुठे विकून अनेकांच्या हाताला दोन पैसे मिळतात. पावसाळ्याच्या सुरवातीला मिळणाऱ्या या मुठ्यावर खवय्ये तुटून पडतात. मुंबई, पुणे आदी शहरामध्ये राहणारे लोक गावाकडून हमखास मुठे नेतात किंवा आणायला सांगतात. प्रामुख्याने आदिवासी बांधव रात्र जागून मुठे पकडतात व बाजाराच्या ठिकाणी विक्रीसाठी आणतात. मुठ्यांचा हंगाम अगदी काही दिवसांचा असतो.

# महाड एमआयडीसी रस्त्यावर खड्डे आणि नाल्यातील पाणी

## वाहनचालक त्रस्त, प्रशासनाचे दुर्लक्ष



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसीमध्ये पावसाळ्यापूर्वी नालेसफाईचे नाटक केले जाते मात्र दरवर्षी नाल्यातील पाणी रस्त्यावर येवून साचत असल्याचे दिसून येत आहे. साफसफाई न झाल्याने गटारे तुंबून पावसाचे पाणी रस्त्यावर येत आहे. यामुळे गटारे आणि रस्ते एक होवून वाहनचालकांना पाण्यातून वाट काढणे कठीण होत आहे. तर अनेक ठिकाणी गटारातील पाणी रस्त्यावरून कंपन्यांच्या आवारात शिरत असल्याने कंपनी प्रशासनालादेखील डोकेदुखी झाली आहे.

प्रतिवर्षी पावसाळ्याच्या तोंडावर महाड औद्योगिक क्षेत्रातील गटारे साफसफाईचा आणि रस्ता दुरुस्तीचा ठेका काढला जातो. मात्र ठेकेदाराकडून तात्पुरती डागडुजी केली जाते. पाऊस सुरु होताच गटार सफाई सोडून दिली जाते. गेली कित्येक वर्षे एकाच ठेकेदाराकडून ही कामे करून घेतली जात आहेत. यामुळे खड्डे भरताना पावसाचा मुहूर्त काढून सुरवात केली जाते आणि पाऊस सुरु होताच पावसाचे कारण देवून खड्डे भरणे आणि गटार सफाईचे काम सोडून देण्याचे काम केले जाते. गटारात गवत आणि माती तशीच पडून राहिल्याने यंदाच्या पावसाळ्यातही येथील गटारे तुंबली आहेत. त्यामुळे गटारातील पाणी रस्त्यावर येत आहे.

महाड एमआयडीसीमधील गटार दुरुस्ती आणि देखभालीकरिता वार्षिक निविदा तत्वावर ठेका दिला जातो. मात्र यावर्षी या कामाच्या देखभालीकडे ठेकेदार आणि प्रशासनाने कानाडोळा केला. यामुळे गटारातील रसायनमिश्रित पाणी रस्त्यावर येत आहे. कारखान्यात ये-जा करणाऱ्या कामगारांना त्यातून चालणे धोकादायक ठरत आहे.

महाड औद्योगिक वसाहतीमधील लासा, वसुंधरा, प्रीव्ही ऑरगॅनिक, आपटे ऑरगॅनिक, सिक्रेंट या कंपन्यांसमोरील रस्त्यावर पाण्याची तळी तयार होत आहेत. याठिकाणी असलेले गटारे अरुंद असल्याने आणि सफाई न झाल्याने कचऱ्याने भरली आहेत. गटारातील पाणी पुढे सरकत नसल्याने ते थेट रस्त्यावर येत आहे. इप्का केमिकलसमोर आणि शेजारील रस्त्यावरदेखील हीच अवस्था आहे. आसनपोई मार्गावर असलेल्या लक्ष्मी ऑरगॅनिकसमोरदेखील मोठ्या प्रमाणात रस्त्यावर सांडपाणी येत आहे. पावसाची संततधार किंवा मुसळधार पावसात पाण्याचा प्रवाह ओढ्याचे स्वरूप धारण करत असल्याने रस्त्यावर मोठे तलाव तयार होत आहेत. लक्ष्मी ऑरगॅनिक कंपनी सखल भागात असल्याने गटारातील पाणी थेट रस्त्यावर येवून कंपनीच्या मुख्य गेटमधून आत शिरत आहे.


## CHANGE OF NAME

I the undersigned **BARRISTAR MUNIRA AABEDIN** (Old name) Residing At **Room No. 18, 3rd Floor, Tapal Naka, Behind Bank of Baroda, Burhani Manzil, Panvel, Navi Mumbai - 410206.**

I Changed my Name by the AFFIDAVIT No. **357/2022** dated **9 July 2022.** So that I remitter issue may here after be called by new Name **MUNIRA AABEDIN BHAI BALISTER.**

Sign. by New Name
**Munira Aabedin Bhai Balister**

# टीम इंडिया झिम्बाब्वे दौऱ्याचे शेड्युल जाहीर

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

रोहित शर्माच्या नेतृत्वाखालील टीम इंडिया सध्या इंग्लंडच्या दौऱ्यावर आहे. त्यानंतर संघ वेस्ट इंडिज दौऱ्यावर जाणार आहे. विंडिज दौऱ्यानंतर टीम इंडियाला झिम्बॉब्वेला जायचे आहे. तीन सामन्यांच्या एकदिवसीय मालिकेसाठी दोन्ही मंडळांनी सहमती दर्शवली आहे. माहितीनुसार हे सामने १८, २० आणि २२ ऑगस्टला खेळले जातील.

भारतीय संघ सहा वर्षांनंतर झिम्बाब्वेचा दौरा करणार आहे. एमएस धोनीच्या नेतृत्वाखालील टीम इंडियाने २०१६मध्ये झिम्बॉब्वेचा दौरा केला होता. तीन एकदिवसीय आणि तितक्याच टी-२० सामन्यांसाठी हा दौरा करण्यात आला होता. या दौऱ्यात एकदिवसीय मालिका खेळवली जाईल. भारताच्या ब संघाने आयर्लंडविरुद्ध दोन टी-२० सामन्यांची मालिका खेळली. भारताचा ब संघही झिम्बॉब्वे दौऱ्यावर जाऊ शकतो. या मालिकेत २०२२च्या टी-२० विश्वचषकापूर्वी राखीव खेळाडूंची कामगिरी तपासली जाऊ शकते.


ऑगस्ट महिन्यात खेळले जाणार सामने

भारतीय संघ सध्या इंग्लंडविरुद्धच्या तीन सामन्यांच्या वनडे आणि टी-२० मालिकेत व्यस्त आहे. भारताचा इंग्लंड दौरा १७ जुलैला संपणार आहे. इंग्लंडनंतर भारतीय संघ वेस्ट इंडिजच्या दौऱ्यावर जाणार आहे, जिथे त्यांना तीन वनडे आणि पाच टी-२० सामने खेळायचे आहेत. विशेष म्हणजे टी-२० मालिकेतील शेवटचे दोन सामने अमेरिकेत खेळले जाणार आहे. वेस्ट इंडिजचा हा दौरा २२ जुलैपासून सुरू होणार असून शेवटचा सामना ७ ऑगस्टला होणार आहे.

वेस्ट इंडिज दौऱ्यानंतर टीम इंडिया झिम्बाब्वे दौऱ्यावर जाणार असून, त्यानंतर भारतीय संघ आशिया कपमध्ये सहभागी होणार आहे. आशिया चषकमध्ये भारताचा २८ ऑगस्टला पाकिस्तानशी सामना होणार आहे. या वेळी आशिया कपचे यजमानपद श्रीलंकेकडे आहे.

## लंडनच्या रस्त्यावर मनसोक्त नाचला सौरव गांगुली

**लंडन : वृत्तसंस्था**

भारताचा माजी कर्णधार आणि क्रिकेट नियामक मंडळाचा अध्यक्ष सौरव गांगुलीने शुक्रवारी (दि. ८) आपला ५०वा वाढदिवस लंडनमध्ये मोठ्या जल्लोषात साजरा केला. आपल्या आयुष्यातील हा सुवर्णक्षण साजरा करण्यासाठी तो आपली मित्रमंडळी आणि कुटुंबियासमवेत लंडनला गेलेला आहे. वाढदिवसाच्या रात्री बीसीसीआय अध्यक्ष असलेला सौरव गांगुली लंडनच्या रस्त्यावर मनसोक्त नाचताना दिसला. या वेळी त्याची मुलगी सना त्याच्यासाठी डीजे झाली होती. या घटनेचा व्हिडिओ सध्या सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे, तसेच चाहत्यांनीही या व्हिडिओला मोठ्या प्रमाणात पसंती दिली आहे.

# जडेजा सीएसकेला करणार राम राम?



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

आयपीएलमधील सर्वांत यशस्वी संघांपैकी एक चेन्नई सुपरकिंग्स हा संघ आहे. महेंद्रसिंग धोनीच्या नेतृत्वाखाली चेन्नई सुपरकिंग्जने चार वेळा आयपीएलचे विजेतेपद जिंकले आहे. आयपीएल २०२२मध्ये स्टार ऑलराऊंडर रवींद्र जडेजाला चेन्नई सुपरकिंग्जचा कर्णधार बनवण्यात आले, मात्र तो त्या हंगामामध्ये पूर्णपणे फ्लॉप ठरला. चेन्नईचा स्टार ऑलराऊंडर रवींद्र जडेजाने आता एक मोठे पाऊल उचलले आहे. जडेजाने सोशल मीडियावर असे काही केले की, फॅन्स म्हणतायत, तो २०२३मध्ये चेन्नई सुपरकिंग्ज सोडतोय.

त्याच्या नेतृत्वाखाली संघाने आठपैकी सहा सामने गमावले. खराब कामगिरीमुळे निराश होऊन त्याने मध्यंतरी कर्णधारपद सोडले आणि दुखापतीमुळे तो स्पर्धेतूनही बाहेर पडला.

रवींद्र जडेजाने या संकेतात त्याच्या अधिकृत इंस्टाग्राम अकाउंटवरून संघाच्या २०२१ आणि २०२२ हंगामाशी संबंधित सर्व पोस्ट डिलीट करून टाकले आहेत. यामुळे जडेजा आयपीएल २०२३ मध्ये सीएसकेकडून खेळू शकणार नसल्याचे मानले जात आहे. जडेजा आणि सीएसकेनेही एकमेकांना अनफॉलो केले आहे.

महिला विश्वचषक हॉकी स्पर्धा

# भारताचा न्यूझीलंडकडून पराभव

**एमस्टीलव्हीन : वृत्तसंस्था**



गोल करण्याच्या नामी संधी वाया दवडल्यामुळे भारताने महिला विश्वचषक हॉकी स्पर्धेमधील न्यूझीलंडविरुद्धच्या ब-गटातील अखेरच्या साखळी सामन्यात ३-४ असा पराभव पत्करला, परंतु गटसाखळीत तिसरे स्थान मिळवणाऱ्या भारताला अन्य गटातील स्पेनविरुद्ध विजय मिळवता आल्यास उपांत्यपूर्व फेरी गाठता येऊ शकते.

ब-गटात न्यूझीलंडने सात गुणांसह अग्रस्थान आणि इंग्लंडने चार गुणांसह दुसरे स्थान मिळवले. प्रत्येकी दोन गुण खात्यावर असले तरी भारताने सरस गोलफरकाआधारे तिसरे स्थान मिळवले. अखेरच्या स्थानावरील चीनचे आव्हान संपुष्टात आले.

या स्पर्धेच्या आराखड्यानुसार, प्रत्येक गटातील अव्वल संघ उपांत्यपूर्व फेरीसाठी थेट पात्र ठरतो, मात्र दुसऱ्या आणि तिसऱ्या स्थानावरील संघांना अन्य गटांतील संघांशी 'क्रॉसओव्हर' म्हणजेच उपउपांत्यपूर्व फेरीचा सामना खेळून उपांत्यपूर्व फेरी गाठता येते. भारताचा क-गटातील दुसऱ्या स्थानावरील स्पेनशी रविवारी (दि. १०) सामना होणार आहे.

भारताला १५ पेनल्टी कॉर्नर्स मिळाले. त्यापैकी एकाचे भारताला गोलमध्ये रूपांतर करता आले. अन्यथा निर्धारित वेळेतच भारताला सामना जिंकता आला असता. भारताकडून वंदना कटारिया (चौथ्या मिनिटाला), लालरेम्सियामी (४४व्या मि.) आणि गुर्जित कौर (५९व्या मि.) यांनी गोल केले. न्यूझीलंडच्या ऑलिव्हिया मेरी (१२व्या, ५४व्या मि.), टीसा जॉप (२९व्या मि.) आणि फ्रान्सिस डेव्हिस (३२व्या मि.) यांनी गोल केले.

## विम्बल्डन टेनिस स्पर्धेत जोकोव्हिच पुन्हा अंतिम फेरीत

**लंडन : वृत्तसंस्था**

अग्रमानांकित सर्बियाच्या नोव्हाक जोकोव्हिचने शुक्रवारी (दि. ८) ब्रिटनच्या कॅमेरून नॉरीवर पिछाडीवरून सरशी साधत सलग चौथ्यांदा आणि एकूण आठव्यांदा विम्बल्डन टेनिस स्पर्धेच्या अंतिम फेरीत धडक मारली. या फेरीत त्याच्यापुढे ऑस्ट्रेलियाच्या निक किरियॉसचे आव्हान असेल.

सलग चौथ्या विम्बल्डन आणि एकूण २१व्या ग्रँडस्लॅम जेतेपदाच्या शोधात असलेल्या जोकोव्हिचने उपांत्य फेरीत नवव्या मानांकित नॉरीला २-६, ६-३, ६-२, ६-४ असे पराभूत केले. सुरुवातीचे सेट गमावल्यानंतर दमदार पुनरागमन करण्यासाठी जोकोव्हिच ओळखला जातो. हेच शुक्रवारच्या सामन्यातही पाहायला मिळाले. प्रथमच ग्रँडस्लॅम स्पर्धेच्या उपांत्य फेरीत खेळणाऱ्या नॉरीने आक्रमक खेळ करताना पहिला सेट ६-२ अशा फरकाने जिंकला. त्याने या सेटमध्ये दोन वेळा जोकोव्हिचची सर्व्हिस तोडली.

यानंतर मात्र जोकोव्हिचने आपला खेळ उंचावत अपेक्षित पुनरागमन केले. त्याने आपल्या आक्रमणाची गती वाढवल्यानंतर २६ वर्षीय नॉरीने चुका करण्यास सुरुवात केली. त्यामुळे जोकोव्हिचने दुसऱ्या आणि तिसऱ्या सेटमध्ये अनुक्रमे ६-३ आणि ६-२ अशी बाजी मारत सामन्यात आघाडी मिळवली. चौथ्या सेटमध्ये नॉरीने जोकोव्हिचला चांगली झुंज दिली. मात्र, जोकोव्हिचने एकदा नॉरीची सर्व्हिस मोडली आणि आपली सर्व्हिस राखत हा सेट ६-४ असा जिंकत स्पर्धेत आगेकूच केली.

# श्रीलंकेविरुद्ध कसोटी सामन्यात स्मिथने ठोकले शतक

**श्रीलंका : वृत्तसंस्था**



ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार स्टीव्ह स्मिथ आणि भारताचा माजी कर्णधार विराट कोहली यांची सतत एकमेकांशी तुलना होते. विशेष म्हणजे हे दोन्ही खेळाडू गेल्या काही काळापासून खराब फॉर्मशी झगडत होते, मात्र आता स्टीव्ह स्मिथ फॉर्ममध्ये आला आहे. श्रीलंकेविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी मालिकेत त्याने शतकी खेळी केली आहे. त्यामुळे आता विराट कोहली कधी फॉर्ममध्ये परतणार? असा प्रश्न चाहते विचारत आहेत.

श्रीलंकेविरुद्ध सुरू असलेल्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी स्टीव्ह स्मिथने कठीण परिस्थितीत शतक झळकावले. स्मिथच्या कसोटी कारकिर्दीतील हे २८वे शतक ठरले. अशी कामगिरी करून त्याने शतकांबाबतीत भारताच्या विराट कोहलीला मागे टाकले आहे. आता तो फॅब ४मध्ये सर्वाधिक शतके झळकावणारा दुसरा खेळाडू बनला आहे. स्मिथ आणि इंग्लंडचा माजी कर्णधार जो रूटच्या नावावर प्रत्येकी २८ शतकांची नोंद आहे, तर विराट कोहलीची २७ आणि न्यूझीलंडच्या केन विल्यमसनची २४ शतके आहेत.

भारताचा माजी कर्णधार असलेला विराट कोहली आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधील स्फोटक फलंदाजांपैकी एक समजला जातो, मात्र गेल्या तीन वर्षांपासून त्याच्या फलंदाजीची धार बोथट झाली आहे. विराटने २०१९ सालापासून शतक झालेले नाही. २०१९पासून विराटने १८ कसोटी सामन्यांतील ३२ डावांमध्ये २७च्या सरासरीने फक्त ८७२ धावा केल्या आहेत.

## एजबेस्टन कसोटीत वर्णद्वेषी टिप्पणी करणाऱ्या प्रेक्षकाला अटक

**इंग्लंड : वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि भारत यांच्या एजबॅस्टन येथे पाचव्या कसोटी सामना खेळला गेला. या कसोटी सामन्यादरम्यान भारतीय चाहत्यांशी वर्णद्वेषी गैरवर्तन केल्याच्या आरोपानंतर बर्मिंगहॅम पोलिसांनी एका व्यक्तीला अटक केली आहे. बर्मिंगहॅम पोलिसांनी अटक केल्याची माहिती ट्विटर दिली आहे. त्याला चौकशीसाठी कोठडीत ठेवण्यात आले आहे. इंग्लंडने शेवटच्या दिवशी ही कसोटी सात गडी राखून जिंकून मालिकेत २-२ अशी बरोबरी साधली. जॉनी बेअरस्टो आणि जो रूट यांनी नाबाद शतके झळकावली.

कसोटीच्या चौथ्या दिवसाच्या खेळादरम्यान इंग्लिश चाहत्यांच्या एका गटाने भारतीय चाहत्यांबद्दल असभ्य कमेंट केल्या होत्या, ज्याच्या तक्रारी ट्विटरच्या माध्यमातून जगासमोर आल्या होत्या. यानंतर एजबॅस्टनचे अधिकारी आणि इंग्लंड आणि वेल्स क्रिकेट बोर्ड यांनी या प्रकरणाची दखल घेत चौकशी सुरू केली. वेस्ट मिडलँड्स पोलिसांच्या प्रवक्त्याने स्काय स्पोर्ट्स न्यूजला सांगितले की, बर्मिंगहॅममधील कसोटी सामन्यादरम्यान वर्णद्वेषी, अपमानास्पद वागणुकीच्या वृत्ताचा आम्ही गुन्हेगारी तपास सुरू केला आहे.

## श्रीलंकेतील आंदोलनादरम्यान जयसूर्यासुद्धा उतरला रस्त्यावर



**गाले : वृत्तसंस्था**

श्रीलंकेतील परिस्थिती सातत्याने बिघडत असून आंदोलक राष्ट्रपती भवनात पोहोचले आहेत.

गोटाबाया राजपक्षे हे त्यांच्या सरकारी निवासस्थानातून पळून गेले आहेत. राजपक्षे यांच्यावर मार्च महिन्यापासून राजीनामा देण्यासाठी दबाव वाढत आहे. शनिवारी (दि. ९) परिस्थिती आणखी बिघडली. गाले येथे सध्या ऑस्ट्रेलिया आणि श्रीलंकेचा कसोटी सामना सुरू असून आंदोलक आता स्टेडियमबाहेर पोहोचले. यादरम्यान जयसूर्याही रस्त्यावर उतरून आंदोलनाला पाठिंबा दिला.

आंदोलकांनी स्टेडियमबाहेरही घोषणाबाजी केली, मात्र याचा परिणाम सामन्यावर झाला नाही.













हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., अॅट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, अॅस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

“Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**